**मे. ऑरो इन्फ्रा प्रा.लि., २१ वा मजला, विंग ए, गॅलेक्सी, प्लॉट नं. १, सर्वेक्षण नं. ८३/१, हैदराबाद नॉलेज सिटी, रायदुर्ग, हैदराबाद-५०००८१ यांच्या प्रस्तावित मे. टाकळी जेना बेलोरा (उत्तर) आणि टाकळी जेना बेलोरा (दक्षिण) कोळसा खाण, मौजा टाकळी, जेना, बेलोरा आणि इतर ८, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे ९३६ हेक्टर खाण लीज क्षेत्रात १.५० दशलक्ष टन प्रतिवर्ष ते ३.० दशलक्ष टन प्रति वर्ष उत्पादन क्षमतेच्या प्रकल्पाच्या विस्तारीकरणाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १४/०८/२०२६ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | टाकळी-जेना-बेलोरा (उत्तर व दक्षिण) कोळसा खाण, एआयपीएल मैदान, भंगाराम मंदिराजवळ, मौजा बेलोरा, तालुका भद्रावती, जिल्हा चंद्रपूर, महाराष्ट्र-४४२९०२. |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. ऑरो इन्फ्रा प्रा.लि., २१ वा मजला, विंग ए, गॅलेक्सी, प्लॉट नं. १, सर्वेक्षण नं. ८३/१, हैदराबाद नॉलेज सिटी, रायदुर्ग, हैदराबाद-५०००८१ यांच्या प्रस्तावित मे. टाकळी जेना बेलोरा (उत्तर) आणि टाकळी जेना बेलोरा (दक्षिण) कोळसा खाण, मौजा टाकळी, जेना, बेलोरा आणि इतर ८, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर येथे ९३६ हेक्टर खाण लीज क्षेत्रात १.५० दशलक्ष टन प्रतिवर्ष ते ३.० दशलक्ष टन प्रति वर्ष उत्पादन क्षमतेच्या प्रकल्पाच्या विस्तारीकरणाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी टीओआर (TOR) दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२५ रोजी मान्यता दिलेली आहे व सुधारित टीओआर (TOR) दिनांक १९ जानेवारी २०२६ रोजी पारित करण्यात आला.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग ए-१ (अ) मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. ऑरो इन्फ्रा प्रा.लि., २१ वा मजला, विंग ए, गॅलेक्सी, प्लॉट नं. १, सर्वेक्षण नं. ८३/१, हैदराबाद नॉलेज सिटी, रायदुर्ग, हैदराबाद-५०००८१ यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक १०/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता प्रत्यक्ष (physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता, नागपूर एडिशन व दैनिक सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द टाईम्स ऑफ इंडीया, नागपूर यात इंग्रजीत दिनांक ०८/०७/२०२६ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२.
३. प्रादेशिक कार्यालय, नवीन सचिवालय बिल्डींग, वने, पर्यावरण व वातावरण बदल मंत्रालय, VCA समोर, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
४. प्रादेशिक कार्यालय/उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर.
९. नगर परिषद भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१०. तहसिल कार्यालय भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
११. पंचायत समिती कार्यालय भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१२. ग्राम पंचायत कार्यालय जेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१३. ग्राम पंचायत कार्यालय पानवडाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१४. ग्राम पंचायत कार्यालय टाकळी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१५. ग्राम पंचायत कार्यालय कान्सा सिरपूर, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१६. ग्राम पंचायत कार्यालय कढोली, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१७. ग्राम पंचायत कार्यालय डोंगरगांव, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
१८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संकेतस्थळ:- www.mpcb.gov.in

वरिल अनुक्रमांक ०५ ते १७ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश दिनांक १९/०७/२०२६ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित करण्यात आली होती:-

१) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई - **सदस्य**
यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर

३) उप-प्रादेशिक अधिकारी, - **समन्वयक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
चंद्रपूर

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ५१ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ.श्री. नितीन व्यवहारे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठ्या संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) व इतर सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या:-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**<u>जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-</u>**

१) **<u>श्री. अजित निळकंठराव फाळके, माजी सरपंच, ग्रामपंचायत कढोली, तथा अध्यक्ष, काँग्रेस सेवा दल किसान संघ, भद्रावती ग्रामीण, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज ऑरो इन्फ्रा हा उद्योग येऊन जवळपास ०२ वर्षे झाली. आज पर्यावरण विषयक जनसुनावणी १.५ दशलक्ष टन पासून ३.० दशलक्ष टन पर्यंत वाढीव उत्पादनासाठी घेण्यात येत आहे. कंपनीने ९३६ हेक्टर जमीन अधिग्रहीत केली आहे. कंपनीने पूर्ण जमीन अधिग्रहीत केली पाहिजे. तसेच गावाचे पुनर्वसन पूर्ण केले पाहिजे. त्यानंतरच वाढीव उत्पादनासाठी हा कार्यक्रमाचे आयोजन करायला पाहिजे होते. पण तसे न करता आज पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्यात आली आहे. यापूर्वी या परिसरातील आणखी एका प्रकल्पाची जनसुनावणी घेण्यात आली होती. त्या जनसुनावणीला आम्ही विरोध केला तरीदेखील त्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली. हे आमच्या जनतेचं दुर्भाग्य आहे. हा जनतेचा आवाज एवढा उठवल्यानंतर तो दाबल्या का जाते? याच उत्तर मला पाहिजे. माझे गाव किलोनी प्रकल्पापासून ५०० मीटर अंतरावर आहे. आमची गट-ग्रामपंचायत कढोली आहे. या गट-ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत कढोली, सोमनाळा, कोंढाळा व किलोनी ही गावे येतात आणि या चारही गावाचा बराचसा भाग या प्रकल्पामध्ये येत आहे. या खाणीचे काम खरच कौतुकास्पद आहे कारण या खाणीच्या शेजारीच एम्टा नावाची खाण आहे. त्याचा इतिहास आमच्या डोळ्यासमोर आहे. त्या खाणीच्या तुलनेत इतकी लहान खाण असून देखील या कंपनीने सीएसआर अंतर्गत जे कार्य अपेक्षित होते ते या खाणीतर्फे करण्यात आले. परंतु काही काम अजूनही शिल्लक आहेत. आमच्या किलोनी या गावाजवळ बेलोरा येथून एक नाला वाहत जातो. त्या नाल्यामध्ये या खाणीने काळे पाणी सोडले होते. त्याबाबत आम्ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी तसेच मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना पत्र दिले आहे. काही दिवसांनी काळे पाणी बंद झाले. परंतु सदर | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | पाण्यामुळे ज्या प्रकल्पग्रस्तांच्या शेळया व गाई मृत्यूमुखी पडल्या त्यांना खाण व्यवस्थापनाकडून नूकसान भरपाई देण्यात आली. तसेच त्या नाल्यातून जे पाणी जाते, त्याला ओलांडून आमच्या कास्तकार वर्गाला पुढ जावे लागते. समोर एम्टा माईन्स असून जंगल लागून आहे. त्या जंगलात डुक्कर, रानडुक्कर व वाघाचे अस्तित्व आहे. अशा अवस्थेत आमच्या शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी कंपनीने काय केले याची माहिती देण्यात यावी. बेलोरा पुनर्वसनात जाईल, जेना बाजुला आहे, त्याच्यानंतर कढोली आहे व पुढे आणखी गावे आहेत. परंतु आमच्या गावाच्या सभोवताली खाणी आसून त्यामुळे आमच्या गावातील पाण्याच्या पातळी इतकी कमी झाली आहे की त्यामुळे उन्हाळ्यामध्ये पाण्याची टंचाई निर्माण होते. याबाबत कंपनीने कोणती उपययोजना केली याची माहिती देण्यात यावी. एक तर पाण्याचा स्त्रोत आम्हाला उपलब्ध करून दिला पाहिजे कारण खाणपाणी असेच सोडण्यापेक्षा आम्हाला उपलब्ध करून दिले पाहिजे. आमचं किलोनी गाव कंपनीने दत्तक घ्यावे. कंपनीने आमच्या चारही गावातील मुलांकरिता बसची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच कंपनीने आर ओ प्लांटची सुविधा पूरविलेली आहे. पण त्याबरोबर जे नाल्यातून पाणी जाते त्याचा वापर सिंचनाकरिता प्रकल्प बाधित म्हणून करू देण्यात यावा. याबाबत ग्रमपंचायतीमार्फत आमसभेचे ठराव दिले आहे. त्यानंतर सन २०२४ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक झाली होती. त्याचे इतिवृत्त माझ्याकडे असून त्यामध्ये नाल्यात जे पाणी जाणार त्याबाबत उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु ते आश्वासन पूर्ण करण्यात आले नाही. कंपनीने त्यांच्या वापराकरिता आमच्या गावाकडे येणाऱ्या रस्त्याचे फक्त ५०० मीटर अंतराचे काम पूर्ण केले आहे. आम्ही किलोनी फाट्यापर्यंत रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत निवेदन कंपनीकडे दिले आहे. सदर रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. कंपनीकडे यंत्रणा असून ते या रस्त्याचे काम करू शकतात. अधिभार ढिगाऱ्याची मागणी कंपनीकडे केली असता परवानगीची मागणी करण्यात येते. ग्रामपंचायतीचे सरपंच व इतर पदाधिकारी यांनी मागणी करून देखील अधिभार ढिगारे देण्यात येत नाही. लेखी परवानगी मागण्यात येते. मा. मंत्री श्री. बावनकुळे यांनी अधिभार | |

| | | |
|---|---|---|
| | ढिगाऱ्यावरचे सर्व निर्बंध हटविले आहे. माझ्या सर्व प्रश्नांचे कंपनी प्रशासनाने गांभीर्याने उत्तरे द्यावी. आज ही कंपनी लहान असून देखील आमच्या बऱ्याच स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. त्याचे आम्ही स्वागत करतो. परंतु कंपनीच्या प्रदूषणाचा सर्वात जास्त धोका आमच्या गावाला आहे. आज कंपनीकडून मोठ्या प्रमाणात डंपिंग करण्यात आली असून त्यावर भविष्यात झाडे लावण्यात येतील व त्यामुळे भविष्यात वन्य प्राण्यांचा धोका वाढू शकतो. वन्य प्राण्यांना मारण्याची परवानगी देखील नाही. अशा परिस्थितीत शेतकरी शेती कशी करणार हा प्रश्न उपस्थित होतो. कंपनीच्या परिसरालगत असणाऱ्या शेतकऱ्यांना नूकसान भरपाई देण्यात यावी. कृषी अधिकाऱ्यांना शेतीची पाहणी करण्यासाठी पाठविण्यात यावे. ते आमच्या शेतात काय पिकते याचा अहवाल सादर करतील व त्यानंतर स्थानिक शेतकऱ्यांना कायमस्वरूपी नूकसान भरपाई देण्यात यावी. | |

**२) <u>श्री. राजेश बेले, संस्थापकीय अध्यक्ष, संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्था, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज पर्यावरण विषयक जनसुनावणी आहे व त्याचे अध्यक्ष मा. अतिरिक्त जिलहादंडाधिकारी आहेत. आपली मी वारंवार खाणीबाबत भेट घेतली आहे. परंतु येथे आपल्या शेजारी जे दोन अधिकारी बसलेले आहेत, ते कुंभकरणी झोपी गेलेले आहे. प्रकल्पाने स्थानिकांना व पर्यावरणाला प्रदूषणापासून कसे वाचविणार याबाबत कोणतीही उपाययोजना सांगितलेली नाही. ही एक शोकांतिका आहे. पर्यावरण जनसुनावणीदरम्यान प्रकल्पाने फकत पर्यावरणावर भाष्य करायला पाहिजे आणि उपाययोजना सांगायला पाहिजे. कंपनीमुळे होणाऱ्या प्रदूषणापासून स्थानिकांचा कसा बचाव केला पाहिजे याबाबत माहिती देणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी श्री. तानाजी यादव व उप-प्रादेशिक अधिकारी श्री. सुशिलकुमार राठोड यांना प्रदूषणाबाबत मी हजारोंच्या संख्येत तक्रारी दिलेल्या आहेत. माझ्या तक्रारींवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नाही. आपण स्वत: काही दिवसांपूर्वी अहवाल | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिलहादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, कंपनी प्रशासनातर्फे जनसुनावणीच्या शेवटी उपस्थित करण्यात आलेल्या सर्व मुद्यांची एकत्रितरीत्या उत्तरे देतील. कारण जनसुनावणीदरम्यान वारंवार मुद्दे उपस्थित होण्याची शक्यता असते. त्यामुळे सर्व उपस्थितांना विनंती आहे की, त्यांचे मुद्दे उपस्थित करावे. |

| | | |
|---|---|---|
| | मागविलेला असून आजपर्यंत त्यांनी आपणाकडे अहवाल सादर केलेला नाही. आपणाकडून न्यायाची अपेक्षा आहे. परंतु अशा अधिकाऱ्यांना चंद्रपूर येथून तात्काळ हलविण्याची वेळ चंद्रपूर जिल्ह्यातील पर्यावरणीय परिस्थितीत व स्थानिकांच्या आरोग्याच्या अहवालानूसार आली आहे. वन्य प्राणी, पाळीव प्राणी, जलचर प्राणी यांच्या जीवाला धोका निर्माण झालेला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व कंपनीच्या संगनमताने जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये घोळ केला जातो. भद्रावती तालुक्यातील नागरीकांना अस्तित्वात असलेल्या खाणींच्या प्रदूषणामुळे मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. त्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नूकसान होत आहे. माझ्या एका स्थानिक गावकरी मित्राने सांगितले की, कंपनीने पाणी सोडले होते. याबाबत प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषा नियत्रण मंडळ यांचेकडे तक्रार दाखल केली होती. आजपर्यंत प्रादेशिक अधिकारी यांनी तक्रारीचे उत्तर दिलेले नाही. तक्रारदारांना त्यांच्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा तपशील का देण्यात येत नाही. तक्रारींवर काय कार्यवाही केली व त्यामुळे स्थानिकांना कोणता फायदा आहे हे कळविणे प्रदूषण नियंत्रण अधिकाऱ्यांचे काम आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांच्याकडे मंडळाच्या सदस्य सचिवांकडे नस्ती पाठविल्याचे उत्तर मिळते. मा. सदस्य सचिवांना संपर्क साधला असता त्यांच्याकडून त्याच्या अधिकारात जी कार्यवाही करता येईल ती केली जाईल असे आश्वासन देण्यात येते परंतु प्रादेशिक अधिकारी यांच्याकडून कारवाई करण्यात येत नाही. पाहणी अहवाल देखील खोटा बनविण्यात येतो कारण प्रकल्प व अधिकाऱ्यांमध्ये संगनमत होते आणि त्यामुळे जनतेला कोणत्याही प्रकारचा न्याय मिळत नाही. आज शेतकऱ्यांना कोणत्याही सोई सुविधा मिळत नाही. स्थानिक शेतकऱ्यांना सुवधिा पूरविण्याचे काम प्रकल्प प्रवर्तकांचे आहे. त्यांना नाल्यावर पूल बांधून देण्यात यावा जेणेकरून शेतकऱ्यांच्या दळण-वळणाचा मार्ग मोकळा होईल. शेतकऱ्यांच्या बैल बंड्या त्यापूलावरून गेल्या पाहिजे. प्रकल्प येथे फकत नफा कमविण्याकरिता काम करत आहे, जनतेच्या सेवेसाठी नाही. प्रकल्पांमुळे आमच्या चंद्रपूरातील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. या ठिकाणी प्रकल्प प्रवर्तकांतर्फे | |

| | | |
|---|---|---|
| | मोफत उपचाराकरिता सुसज्जित दवाखाना का उपलब्ध करण्यात येत नाही? प्रकल्पाने दवाखान्याची सुविधा उपलब्ध करून द्यायला पाहिजे. तसेच स्थानिक नागरीकांचे मुलं खाजगी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. स्थानिक विद्यार्थ्यांकरिता प्रकल्पाने शाळा उपलब्ध करून मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यायला पाहिजे. या क्षेत्रात असा एकही प्रकल्प नाही ज्यांनी गावकऱ्यांसाठी व शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. भारत या देशाचा शेतकरी कणा असून प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचा फायदा होत नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी तक्रारींकडे दुलर्क्ष करतात. माझी एकच मागणी आहे की, प्रकल्पातर्फे गावकऱ्यांचे नुकसान होणार नाही याकरिता कोणत्या उपाययोजना करणार आहे याची माहिती देण्यात यावी. तसेच गावकऱ्यांच्या उच्च शिक्षणासाठी विद्यालयाची सुविधा पूरविण्यात यावी. शेतकऱ्यांना दळण वळणासाठी रस्ते बनवून द्यावे. तसेच शेतकऱ्यांना नूकसान भरपाई देण्यात यावी. तसेच तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करून दवाखाना उभारण्यात यावा. तसेच या सर्व मुद्यांबाबत कंपनीने तात्काळ उत्तरे द्यावी. पर्यावरण जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेलया मुद्यांबाबत तात्काळ स्पष्टीकरण देण्याची तरतूद कायद्यानूसार बंधनकारक आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की कंपनी प्रशासनाने उत्तरे द्यावी. आमची पुन्हा एक मागणी आहे की, स्थानिकांना प्रकल्पामध्ये रोजगार देण्यात यावे आणि छोट्या-मोठ्या कंत्राट स्थानिक बचत गटांना देण्यात यावे. स्थानिक बेरोजगार युवकांना कंपनीमध्ये कंत्राट देण्यात यावे कारण परप्रांतीय लोक स्थानिकांची पिळवणूक करून काम करवून घेतात. तसेच कमी वेतन देण्यात येते. स्थानिकांची पिळवणूक झाली नाही पाहिजे. महिलांना देखील ५० टक्के प्राधान्य देण्यात यावे. जर उपाययोजना झाल्या नाहीत तर न्यायालयात दाद मागण्यात येईल. केंद्र शासनाच्या वेतन धोरणानूसार स्थानिकांना वेतन देण्यात यावे. | |

### ३) अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर:-

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिलहादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, उपस्थितांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे म्हणणे थोडक्यात मांडावे. सदर जनसुनावणी दरम्यान छायाचित्रिकरण करण्यात येत असून आपण उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची नोंद इतिवृत्तामध्ये घेण्यात येत आहे. तसेच जनसुनावणीच्या इतिवृत्तासोबत छायाचित्रीकरणाची प्रत जोडण्यात येते. मी सर्वांना खात्री देतो की, आज जी जनसुनावणी होईल त्यामधील एकही शब्द काढल्या जाणार नाही. जनसुनावणीचे इतिवृत्त म.प्र.नि. मंडळाच्या संकेतस्थळावर विनामुल्य उपलब्ध असते. |

### ४) श्री. विनोद नागपूरे, कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ही कंपनी आपल्या महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यात असून येथील परप्रांतीय कामगार मराठी भाषेचा विरोध करत आहेत. व्यंकटेश शेख नावाचा माणूस कंपनीमध्ये ऑपरेटर म्हणून कार्यरत असून मराठी भाषेचा विरोध करत होता. आपल्या विभागात कंपन्या राहिल्या तर आपल्या युवा वर्गाला रोजगार तरी मिळेल. बाहेरच्या लोकांचे वर्चस्व राहायला नको. परप्रांतीय लोकांना स्थायी रोजगार उपलब्ध असून स्थानिकांना कंत्राटी रोजगार देण्यात येतो. ११ महिन्यांपासून आम्ही बेरोजगार होतो. कंपनीला आमचा विरोध नाही. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उद्योग आल्यास स्थानिकांचा फायदा होणार आहे. पण परप्रांतीय नागरिक स्थानिक मराठी माणसाचे अस्तित्व संपवत असून त्याचा विरोध का करायचा नाही. येथील स्थानिकांनी त्यांच्या जमीनी प्रकल्पाकरिता दिल्या असून त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. नाल्याच्या दुसऱ्या बाजूला माझी जमीन आहे. अरविंदो आणि एम्टा कंपनीमुळे माझी शेती खराब झाली आहे. मी एकाच कंपनीला दोष देत नाही. मी देखील एक कामगार आहे. मला ११ महिने अरविंदो कंपनीने रिकामे ठेवले. मराठी भाषेचा विरोध करणे चुकीचे आहे किंवा नाही याबाबत मला स्पष्टीकरण देण्यात यावे. सदर व्यक्ति मराठी माणसाला दहा दिवस कामावरून निलंबित करण्याची धमकी देत आहे. माझ्याकडून काही चुकीचे शब्द निघाल्यास मी माफी मागतो. परंतु कंपनीने त्यांच्या कर्मचाऱ्यांवर दबाव ठेवायला पाहिजे. कंपनीने मला ११ | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्याची भाषा मराठी असल्याने मराठी भाषेतच कामकाज चालेल. आपण सर्वांचा विनंती आहे की, मुद्दे मांडताना अशासकीय भाषेचा वापर करू नये. आपल्या भावना आम्ही समजू शकतो. मराठी भाषेवर अन्याय होणार नाही. त्या इसमावर कारवाई करण्यात येईल. तसेच आपल्या मुद्याची नोंद इतिवृत्तामध्ये घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | महिन्याचे वेतन दिले नाही. या दोन कंपन्यानी शेतात जाण्यासाठी रस्ते बंद केले. माझ्यातर्फे चुकीच्या भाषेचा वापर केल्याबद्दल मी माफी मागतो. मला कंपनीचा विरोध नसून मराठी भाषेचा विरोध करणाऱ्यांचा विरोध आहे. कंपनीने पब्लिक कंसल्टंट कार्यालया या क्षेत्रामध्ये सुरू करावे जेणेकरून स्थानिकांच्या तक्रारींचे निवारण करणे शक्य होईल. | |

## ५) <u>सौ. संगिता सुरेश देहारकर, प्रशासक, गट-ग्रामपंचायत टाकळी, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर कंपनीच्या सीएसआर निधीमधून प्रकल्पबाधित ६ गावांमध्ये आरओ प्लांटची सुविधा मिळाली आणि दि. ०८/०८/२०२६ रोजी मा. खासदार महोदया यांच्या हस्ते शिबीराचे आयोजन करण्यात आले. तसेच विविध उपक्रम राबविण्यात आले. प्रदूषण होऊ नये यासाठी पाण्याचे फवारे आणि खाणीमधून निघणाऱ्या वाहनांची चाक धूवून पुढे पाठविण्यात येत आहेत. कंपनीने आमच्या गावांमध्ये सोई सुविधा उपलब्ध करून दिल्या त्याकरिता कंपनीने आभार मानते. कंपनीला एकच विनंती आहे की, बेलोरा गावातील ५०-६० टक्के घरे कंपनीने घेतली असून उर्वरित घरे देखील घेण्यात यावे. ५०-६० टक्के घरे गेल्यामुळे गावामध्ये चोरीचे प्रमाण वाढले आहे. उर्वरित घरांना कंपनीतर्फे सुरक्षा पूरविण्यात यावी ही नम्र विनंती आहे. कंपनीतर्फे फक्त स्थानिक नागरीकांनाच कामे देण्यात यावी कारण परप्रांतीयांमुळे स्थानिकांना त्रास सहन करावा लागतो. कंपनीतर्फे जमीन अधिग्रहीत केल्यामुळे स्थानिक नागरीक रस्त्यावर आले आहेत. तसेच कंपनीने स्थानिकांना प्राधान्य द्यावे. करारनाम्यामध्ये ज्या अटी शर्ती लागू केल्या होत्या त्यामध्ये वेज बोर्ड हे सर्व कामगारांना लागू करण्यात यावे. ही कंपनी आल्यापासून बेलोरा गावातील स्थानिकांना रोजगार मिळाला आहे परंतु त्याचे वेतन फार कमी आहे. त्यांच्या वेतनामध्ये वाढ करण्यात यावी ही नमं विनंती आहे. तसेच या कंपनीमध्ये युवकांपेक्षा युवतींना जासत प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे मला या कंपनीचा अभिमान आहे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

६) **श्री. विजय ताजने, जेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
| --- | --- | --- |
| १) | कंपनीच्या पे-रोलवर २ महिन्यांपूर्वी दोन व्यक्तिंना नोकरी देण्यात आली. सदर दोन व्यक्तिंना कोणाच्या दबावाखाली घेण्यात आले काय किंवा ते स्थानिक होते याची माहिती देण्यात यावी. सन १९७१ च्या कायद्यानूसार समान काम समान वेतन लागू का करण्यात आला नाही? या कंपनीमध्ये माझ्या नंतर नोकरीला लागलेल्या व्यक्तिंना माझ्यापेक्षा जास्त वेतन देण्यात येत आहे. आमच्यासोबत कंपनीतर्फे व्यवस्थित वागणूक करत नाही. मी या कंपनीमध्ये ३ वर्षांपासून कामगार आहे. येथे फक्त पुढील १, २ व ६ महिन्यात काम करण्याचे आश्वासन दिले जाते. मी डंपर ऑपरेटरकरिता मुलाखत दिली होती परंतु मला भारत बेन्झचे वाहन चालविण्याचे काम देण्यात आले. मला माझ्या गुणवत्तेनूसार काम मिळणार आहे. परंतु या कंपनीमध्ये स्थानिकांना दुय्यम प्राधान्य दिले जाते. सर्वप्रथम तेलंगणा व आंध्रप्रदेश मधील व्यक्तिंना प्राधान्य दिले जाते. त्यानंतर महाराष्ट्रातील युवकांना प्राधान्य दिले जाते. स्थानिक महिलांचे दोन महिन्याचे वेतन स्थगित करण्यात येतात. कामगारांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत शासनाच्या नियमानूसार व्हायला पाहिजे. कंपीनचे मानव संसाधन विभागाचे अधिकारी कामगारांना वेतन वाढविण्याचे आश्वासन देतात. स्थानिक कामगारांच्या वेतनात फक्त ५०-६० रूपयांची वाढ करण्यात येते व परप्रांतीयांच्या वेतनामध्ये भरघोस वाढ करण्यात येते. कंपनीतर्फे महाराष्ट्रातील स्थानिकांना मुर्खांचा बाजार समजले जाते. वेतन स्थगिती विरोधात आवाज उठविल्यानंतर दोन महिन्यांचे वेतन देण्यात आले. मंचावर उपस्थित अधिकारी यांनी माझ्या प्रश्नांची उत्तरे द्यावी. कंपनीतर्फे उत्तरे दिलो जात नसून कामगारांना टार्गेट केले जाते. वेतनाचा विषय काढला की कामगार चुप राहतात व कामाचा विषय काढला की बोलतात. कंपनीचे अधिकारी फक्त उत्पादनाचे काम असलयाचे सांगतात. कंपनीतर्फे कामगारांना सिव्हील ड्रेसमध्ये जनसुनावणीमध्ये येण्यास सांगितले. मंचावर उपस्थित अधिकाऱ्यांनी माझ्या प्रश्नांची उत्तरे द्यावी अन्यथा कंपनी आणि अधिकाऱ्यांमध्ये संगनमत असल्याचे समजले | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, जनसुनावणीदरम्यान स्थानिकांनी त्यांचे मत नोंदवावे. त्याबाबत कंपनीतर्फे उत्तर देण्यात येईल. सदर जनसुनावणीचे ईतिवृत्त केंद्र शासनाकडे सादर करण्यात येतील.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपली समस्या कंपनीच्या अंतर्गत बाब आहे. सदर बाब कंपनी मालक व कर्मचारी यांच्यातला वाद आहे. या ठिकाणी पर्यावरण विषयक बाबींवर चर्चा करण्याचे माध्यम आहे. आपण मला कार्यालयात येऊन भेटावे, आपल्या समस्येचे निराकरण करण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, या ठिकाणी वैयक्तिक मुद्दे मांडण्यात येऊ नये. कंपनीच्या अंतर्गत मुद्यांबाबात कंपनीच्या व्यवस्थापकांशी चर्चा करण्यात यावी व तोडगा काढण्यात यावा.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सेफ्टी विभागाचे वेतन वर्षातून दोन वेळा कायद्यानूसार वाढविण्यात येतात. एखाद्या कर्मचाऱ्याचे वेतन ठरविताना त्याचा त्या कामाचा अनुभव, मागील कंपनीमध्ये त्याला मिळत असलेले वेतन इत्यादी बाबींवरून त्याचे पुढील वेतन ठरविले जाते. त्यानूसार वेतनामध्ये थोड्या प्रमाणात फरक राहणार आहे.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, उपस्थितांना त्यांचे मुद्दे |

| | | |
|---|---|---|
| | जाईल. मला उत्तर मिळाल्याशिवाय मी येथून जाणार नाही. मला कंपनीने निलंबित केले तरी चालेल. मी कुठला नेता नसून एक सर्व सामान्य व्यक्ति आहे. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी उत्तरे द्यावी. आजपर्यंत कधीही कोणताही अधिकारी भेटला नाही. मंगळवारी झालेल्या कंपनीच्या बैठकीमध्ये जी व्यक्ति वरिष्ठ आहे त्यांचे वेतन ज्येष्ठतेनूसार ठरविले जाईल असे सांगण्यात आले. त्यामध्ये जे माझ्या नंतर कंपनीमध्ये कामगार म्हणून लागले त्यांना स्थाई रोजगार कसा काय देण्यात आला. मला या कंपनीमध्ये ३ वर्षे पूर्ण झालेली असून मला कायमस्वरूपी का करण्यात आले नाही. जनसुनावणीच्या दिवशीच आम्हाला बोलण्याची संधी मिळते. कंपनीचे अधिकारी इतर दिवस आमचे ऐकून घेत नाहीत. सदर अधिकारी उत्तर देण्यास सक्षम नाही. आमच्या नंतर कंपनीमध्ये कामाला लागून देखील त्यांना वेतनात वाढ व सर्व सुविधा कंपनीतर्फे देण्यात येते. आजपर्यंत आम्हाला वैद्यकीय सेवा लागू करण्यात आलेली नाही. आमच्या ग्रामवासीयांना कायमस्वरूपी रोजगार कधी मिळणार याची माहिती देण्यात यावी. समान काम समान वेतन केव्हा लागू होईल याची माहिती देण्यात येईल. | मांडण्याची संधी देण्यात यावी. कंपनीतर्फे आपल्या मुद्यांबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. |

**७) <u>डॉ. अंकुश आगलावे, सामाजिक कार्यकर्ता, बोर्डा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | याच ठिकाणी सन २०२२ मध्ये ९३६ हे.आर जमीन संपादित करण्याच्या उद्देशाने अंदाजे १.५ दशलक्ष टन उत्पादनाकरिता परवानगी घेण्याकरिता सभा आयोजित करण्यात आली होती. त्या सभेला श्री. मेश्राम हे उपजिल्हाधिकारी हजर होते. या ठिकाणी सरपंच व इतर २-३ लोक जे बोलले, ते काही वाईट नाही बोलले. त्यांच्या मनातील वाईट अनुभव येथे बोलून दाखविला. स्थानिकांचा आवाज कायद्याचा वापर करून दाबण्याचा प्रयत्न केल्यास उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही. ही वास्तविकता आहे. ४ वर्षांनंतर आपण जी सुनावणी आयोजित केली त्यामध्ये एकाही प्रश्नाचे उत्तर देण्यात आले नाही. माहितीच्या अधिकाराअंतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मागील जनसुनावणीचा संपूर्ण रेकॉर्ड मी घेऊन आलेलो आहे. आज ३.० दशलक्ष | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता कंपनीने पर्यावरण सल्लागारांची नेमणूक केलेली असून पर्यावरण सल्लागार उत्तरे देतील. |

| | | |
|---|---|---|
| | टन उत्पादनाकरिता जनसुनावणी घेत आहात. १.५ दशलक्ष टन कोळशाचे उत्खनन कोणत्या परवानगीने काढण्यात आला याबाबत मी प्रश्न उपस्थित करत आहे. त्याचं उत्तर कंपनी प्रशासनाला द्यावे लागेल. आमच्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी कंपनीकडून कोणते अधिकृत अधिकारी येथे उपस्थित आहेत याची माहिती सर्व प्रथम देण्यात यावी. | |
| २) | पर्यावरण सल्लागारांना या प्रश्नांची उत्तरे देण्याचा अधिकार आहे काय? दि. २१/०६/२०२२ रोजी जनसुनावणी झाली. त्यावेळी श्री. एस.के.राय हे अधिकारी होते. आज ते या ठिकाणी उपस्थित आहेत काय? आम्ही जे निदेवन तुम्हाला देत आहो, जे गाऱ्हाणे आपणासमक्ष मांडत आहोत, त्याचे निराकरण करण्यासाठी शासक म्हणून जिल्हाधिकारी महोदय उपस्थित आहेत. कंपनीवर आमचा रोष नाही. सदर प्रकल्पापासून १९ कि.मी. अंतरावर ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प आहे. तसेच भांदक, सालोरी व शेगाव हे वनक्षेत्र १० कि.मी. क्षेत्रात आहेत. आपण ईआयए रिपोर्ट मध्ये कोणत्याही जंगली जनावराचे वास्तव्य नसल्याचे सांगितले. महाराष्ट्र राज्याचे वन्य जीव मुख्य संरक्षक सांगतात की या क्षेत्रामध्ये लिझार्ड नावाने वन्य प्राण्याचे वास्तव्य आहे. कुठल्या आधारे तुम्हाला परवानगी मिळाली याची माहिती देण्यात यावे. या ठिकाणी वाघाचे वास्तव्य असताना संमती देता येत नाही. प्रकल्पग्रस्तांच्या खोट्या सह्या घेऊन शासनाची दिशाभूल या कंपनीने केली आहे. त्यावर अध्यक्ष काय कार्यवाही करणार याची माहिती देण्यात यावी. असे अनेक प्रकार आहेत. आता तुम्ही ३.० दशलक्ष टन उत्पादनाकरिता जनसुनावणी लावली आहे. म्हणजे परत बोगस कागद सादर करण्यात येतील. ४ वर्षांपूर्वी सर्व ११ ग्रामपंचायतींच्या ग्रामसभेचे ठराव घेऊन निवेदन देण्यात आले होते. त्यांचया मागणीप्रमाणे १० टक्के देखील काम करण्यात आले नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने सर्वात मोठा अधिकार ग्रामसभेला दिला आहे. अशी माहिती मिळाली आहे की, आपण ४०० पानांचा ईआयए रिपोर्ट गावांमध्ये ४ दिवसांपूर्वी जमी करण्यात आला जेणेकरून स्थानिकांना प्रकल्पाबाबत माहिती मिळालीच नाही पाहिजे हा उद्देश्य दिसून येते. सदर जनसुनावणी स्थानिकांच्या समस्या ऐकण्यासाठी लावलेली आहे. त्यामुळे संबंधित ग्रामसेवकांना जनसुनावणीबाबत ग्रामस्थांपर्यंत माहिती | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | पूरविणे देखील शक्य झाले नाही व समजवता देखील आले नाही. या ठिकाणी युवक खरं बोलत आहेत. | |
| ३) | दि. २१ जून २०२२ रोजीच्या जनसुनावणीत प्रकल्पग्रस्तांचा आक्षेप असताना अरविंदो कंपनीला पर्यावरण मंत्रालयाने मंजूरी दिलेली आहे. ही मंजूरी अरविंदो कंपनीने खोटे दस्तऐवज व प्रकल्पग्रस्तांच्या खोट्या सह्या करून प्रशासनाची मंजूरी प्राप्त करून घेतलेली आहे. या मंजुरी प्रस्तावावर प्रकल्पग्रस्तांचे नाव नसून इतर जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांचे परवानगी असल्याचे दाखवून त्यांचे सह्या घेऊन पर्यावरण मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर करून मान्य करून घेतलेल्या हे खोट्या आधारावर आहे. भद्रावती तालुक्यातील १ ते २ प्रकल्पग्रस्तांचे नाव लिहून व खोट्या सह्या करून प्रस्ताव सादर केलेला असल्याचे निदर्शनास येत आहे. महाराष्ट्र प्रदूषण बोर्ड व पर्यावरण मंत्रालयात खोटे कागदपत्र सादर करून मंजूरी मिळवून घेतलेली आहे. अरविंदो कंपनीने खोटा प्रस्ताव सादर केलेला आहे त्यांचेवर फौजदारी मामला दाखल करून तात्काळ कारवाई करण्यात यावी. ग्रामसभेने अनेकदा ठराव देऊनही त्यावर कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी आलेली नाही किंवा दखल घेतलेली नाही. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ४) | पर्यावरण सुनावणीत मी प्रश्न विचारला की अरविंदो कंपनीचे मालक या ठिकाणी उपस्थित आहेत की नाही, कारण मी जरी लेखी निवेदन दिलेले असले तरी जनसुनावणीत आम्हाला आमच्या व्यथा मांडायच्या आहेत कारण शासनाने स्थानिक जनतेच्या सूचना, आक्षेप व्यवस्थित नोंदविण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाचे जाहीर नोटीस ३० दिवसा अगोदर स्थानिक व राष्ट्रीय स्तराच्या वृत्तपत्रात देणे बंधनकारक आहे. तशी वृत्तपत्रात माहिती देण्यात आली की नाही याबाबत सविस्तर माहिती द्यावी. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ५) | ९३६ हे. आर. जमीन खुली व भूमिगत खाणीसाठी कंपनीद्वारे अधिग्रहण केली असून जमीनीचा वाढीव भाव, रोजगार, वेतन पॉलिसी, वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेडच्या एन.सी.डब्ल्यु. बोर्डाच्या धर्तीवर किंवा एनपीसी पॉलिसी प्रमाणे या भारत सरकार श्रम व रोजगार मंत्रालय लेबर कमिशनरच्या आदेश क्रं. ९२ (१)/२०१७ एमडब्ल्यू, आदेश दिनांक ०९/०४/२०२६ प्रमाणे देणार याचा खुलासा करावा. एचपीसी आपल्याला लागू आहे काय? किमान | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सद्य:स्थितीत केंद्र शासनाच्या किमान वेतन धोरणानूसार वेतन देण्यात येत आहे. एचपीसीबाबत दोन अर्ज कामगार आयुक्तांच्या कार्यालयाकडे सादर केले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलबजावणी करण्यात येईल. कामगारांची एकाच स्तरावर नियुक्ती करण्यात येईल. त्यानंतर कामगारांना आमच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये सर्व प्रकारचे प्रशिक्षण |

| | | |
|---|---|---|
| | वेतन ४ वर्गातल्या म्हणजेच उच्च कुशल, कुशल, अकुशल याकरिता ६ महिन्यांतून सुधारणा करण्यात येते. त्यानूसार रू. १०००/- दैनंदिन वेतन उच्च कुशल कामगाराला, रू. ८००/- मध्यम कुशल कामगाराला वेतन देणे बंधनकारक आहे. स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार नोकरी देणार किंवा त्याना मजदूर म्हणून नोकरी देणार याची माहिती देण्यात यावी. सुवकांना त्यांच्या शिक्षणाचा फायदा मिळाला पाहिजे. कामगार मंत्रालयाच्या अधिसूचनेचे पालन करून स्थानिकांना ४ वर्गानूसार नियुक्ती पत्र देणार काय? आणि त्यामध्ये कोणत्या अटी व शर्ती टाकण्यात येतील याची माहिती देण्यात यावी. या प्रश्नाचे उत्तर मिळाल्याशिवाय मी इथून जाणार नाही. कंपनीने जमीन अधिग्रहीत करून स्थानिकांची हालअपेष्टा केली आहे. जर समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत तर न्यायालयात दाद मागण्यात येईल व परवानगी रद्द करण्यात येईल. | देण्यात येईल. प्रशिक्षण झाल्यानंतर आमच्या मानक कार्यप्रणालीनूसार जो उमेदवार उत्तीर्ण होईल त्यांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार एक वर्षांनंतर त्या वर्गात टाकण्यात येईल. |
| ६) | कंपनीचे म्हणणे आहे की, कामगारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार नेमणूक करण्यात येईल. तसेच किमान वेतन कायद्यानूसार कामगारांना वेतन देण्यात येईल. हा पगार फक्त रू. २०,०००/- इतकाच देण्यात येणार असून स्थानिक नागरीक तुटपुंज्या वेतनामध्ये काम करायला तयार नाहीत. आमच्या शेतामध्ये शेतमजूराला देखील यापेक्षा जास्त वेतन मिळते. वे.को.लि.मध्ये रू. ८०,०००/- इतके सुरूवातीचे वेतन आहे. वे.को.लि.च्या वेतनामध्ये दर ६ महिन्यामध्ये वाढ करण्यात येते. मानव अधिकार संघटनेला जवळपास ५० लोकांनी निवेदन दिले आहे. कंपनीने सदर धोरणाची किमान अंमलबजावणी तरी करावी. कंपनी जास्ती जास्त किती वेतन देणार याची माहिती देण्यात यावी. आपली कंपनी खाजगी असल्याने स्थानिकांच्या मागणीनूसार आपणांस वेतन द्यावे लागेल. रू. २०,०००/- च्या वेतनावर कोणीही आपल्या प्रकल्पामध्ये नोकरी करणार नाही. कंपनी रू. १.० लक्ष प्रमाणे वेतन देऊ शकते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जास्तीत जास्त वेतनाबाबत असे अचानकपणे सांगता येणार नाही. कामगार कायद्यानूसार जे वेतनात बसते त्यानूसार वेतन देण्यात येईल. |
| ७) | ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी आपण अधिग्रहीत केली आहे त्यांना नोकरी देण्यात येत आहे. परंतु बारा बलुतेदार जसे की, चांभार, कुंभार यांच्याबाबत कंपनीचे काय धोरण आहे? परप्रांतीयांना ९० टक्के या खाणीमध्ये प्राधान्य दिले जाते. सर्व प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र देण्यात यावे आणि त्यामध्ये बाहेरचा एकही माणूस असायला | आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात येत आहे.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, शेतीवर अवलंबून असणाऱ्या स्थानिकांना प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र देण्याबाबत आम्हाला हरकत नाही आहे. परंतु सदर बाब ही शासकीय विभागांच्या अखत्यारीत येते. शासकीय विभागाकडून मंजूरी |

| | | |
|---|---|---|
| | नको. ११३० नोकऱ्या कंपनीने दिल्या, त्यांच्या वेतनाबाबत देखील माहिती दिली. परंतु शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देऊन रोजगारात सामावून घेणार काय? मागे जनसुनावणीदरम्यान देखील कूणीही उत्तर दिले नाही. बोगस कागदपत्रांच्या आधारे पर्यावरणीय मंजूरी मिळविण्यात आली. आता ते होणार नाही. मा. जिल्हाधिकाऱ्यांनी कंपनीला प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्याचे आदेश द्यावे. | मिळाल्यास प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र देण्यात येईल. कंपनीतर्फे स्थानिकांना जास्तीत जास्त प्रमाणात नोकऱ्या दिलेल्या आहेत. आमचा रोजगाराबाबतचा रेकॉर्ड पाहिल्यास आमच्यातर्फे टाकळी, जेना, भद्रावती व चंद्रपूर येथील स्थानिकांना ८० टक्के नोकऱ्या दिलेल्या आहेत.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिलहादंडाधिकारी, चंद्रपूर सांगितले की, शासनाच्या प्रक्रियेनूसार कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर स्थानिकांना प्रकल्पग्रस्तचे प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर कंपनीतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| ८) | प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कंपनीत शैक्षणिक योग्यतेनूसार तसेच स्त्री पुरूष समानता नूसार वेस्टर्न कोलफिल्डच्या धर्तीवर रोजगार देण्यात यावे अशी आम्हा सर्व प्रकल्पग्रस्तांची मागणी आहे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ९) | प्रकल्प प्रवर्तकांनी संबंधित व्यक्तिस अधिकार दिला आहे अशा स्वरूपाचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयास सुपूर्द केलेले पाहिजे. माग तो स्टॅम्प पेपरवर दिलेला आहे काय, नुसते पत्र दिलेले आहे. कारण प्रकल्पाच्या जनरल मॅनेजरला (मुख्य व्यवस्थापक) शेतकऱ्याच्या व्यथा सोडविण्याचा अधिकार आहे काय? येथे आमचे शासक जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून अप्पर जिल्हाधिकारी हे उपस्थित आहेत. त्यामुळे उपस्थित जनतेने जी जी कायदेशीर मागणी केली, त्याची परिपूर्तता गोटाळा रिठ गोवार दिप रिठी, खंडाळा रिठ, किलोनी, डोंगरगाव सोमनाळी येथील २३६ हेक्टर जमीन खुली खदानीसाठी घेणार आहेत तर आपण येथे २०१३ चा कायदा वापरणार आहात का Direct negotiation करणार आहात याचा खुलासा करण्यात यावा, पुनर्वसन व पुनर्स्थापन धोरण कुठे वापरणार आहात? | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १०) | सदरहू कंपनी अरबिंदो रियालिटी अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटे, हैदराबाद ह्या नावाने ही कंपनी येथे जनसुनावणीसाठी आलेली आहे ते हेच नाव ठेवणार का दुसरे, कारण यवतमाळ मुकुटबन येथे कंपनी मालकाने कंपनी सुरू केलयानंतर २-३ वर्षात ६०० कोटी रूपये फायदा घेऊन परस्पर दुसऱ्याला विकली. त्यात | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | शेतकऱ्यांना हिस्साच मिळाला नाही, ह्याची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयाने घ्यावी. | |
| ११) | खाण उद्योगाला कोळसा भरविणे, कोळसा उतरविणे, कोळसा वाहतूक, शेती शेतजमीन, पशुपालन, शेतकरी, शेतमजूर, रस्त्यावरील गाव, रस्त्या शेजारील शेती या धुळ प्रदूषणामुळे त्रास होणार आहे. त्याबाबत उपाययोजना सांगण्यात याव्यात. जिल्हाधिकारी साहेब, मी आपणांस आवाहन करतो की, बेलोरा खदान सुरू होणार आहे ते रेल्वे स्टेशन नागरीला जाणार आहे, तर खदानीतून किती टनाचा ट्रक भरून जाणार आहे, त्याला कॅरियर लावणार का, रस्त्याची मिती टन वाहतूक करण्याची क्षमता आहे याचा उल्लेख कार्यकारी सारांश अहवालात नाही. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १२) | वेकोलिप्रमाणे प्रकल्पातील नागरीकांना प्रकल्पग्रस्त म्हणून प्रमाणपत्र देणार काय, शासनाच्या प्रकल्पास शासन प्रमाणपत्र देते, आता वेकोलि सुद्धा प्रमाणपत्र द्यायला लागली आहे. याचा फायदा संबंधित प्रकल्पग्रस्त व्यक्तिस कंपनीच्या विविध कामात टेंडर टाकता येते ह्याचा अधिकार प्रकल्पातील जनरल मॅनेजरला आहेत जर ते नाही म्हटले तर त्यांच्या विरूद्ध म.प्र.नि. मंडळाने फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात यावा. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १३) | मागील जनसुनावणीमध्ये २६३००० झाडांची लागवड २४० हेक्टरमध्ये करण्याचे प्रस्तावित असल्याचे सांगण्यात आले होते. ही माहिती माहितीच्या अधिकाराअंतर्गत मागितलेली आहे. परंतु त्यापैकी एकही झाड दिसत नाही. ही देखील शेतकऱ्यांची फसवणूक आहे. एका माणसाला जीवन जगण्यासाठी ७ किलो प्राणवायुची गरज असते. ही जनसुनावणी केवळ औपचारिकता आहे. तसेच येथे प्रजनन क्षमतेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे ते सत्य आहे. तरी जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की ज्या ज्या ठिकाणी खाणीचे उत्खनन सुरू आहे, त्या परिसरातील दहा वर्षांपूर्वी लग्न झालेल्या जोडप्याचे सर्वेक्षण करावे, सर्वांना माहित आहे की कोळशामध्ये जस्त आहे, त्यामुळे प्रजननात बाधा उत्पन्न होते, कोळशात जे विविध घटक आहे, ते मानवी व पशुपक्षीस जीवनास वाईट आहे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १४) | तसेच नैसर्गिक नाला वळविल्यामुळे ज्या शेतीचे नूकसान होणार आहे. ते कंपनीने द्यायला पाहिजे. त्याप्रमाणे ओपनकास्ट मायनिंगमध्ये ३४ वर्षांचा करार संपल्यानंतर ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी घेतल्या त्या क्लेम करून परत | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | देणार आहेत मात्र तसे लेखी झालेले नाही. तिथे ८८४ शेतकरी आहेत की त्यांच्याकडे ७/१२ आहे. प्रकल्पात ११३० व्यक्तिंना रोजगार देऊ असे अहवालात नमूद केलेले आहे. मात्र कोठेच लिहीलेले नाही की कायम नोकऱ्या देऊ. प्रदूषणामुळे व कोळशाच्या प्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांवर उपाययोजना अहवालात सुचविलेल्या नाहीत. एकूण प्रकल्पाचया ३३ टक्के हरित पट्टा विकसित करण्याचे अहवालात नमूद करण्यात आलेले आहे. २०२० च्या लोकसंख्येनूसार हरित पट्टा विकसित करणार, तर आता २०२६ आहे, तर त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. | |
| १५) | तरी खोटी माहिती देऊन ग्रामस्थांनी, शासनाची पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल फसवणूक केलेली आहे. या अहवालात प्रदूषणाच्या दृष्टीने प्रकल्पाच्या दृष्टीने, जमीन मालकाच्या दृष्टीने सुधारणा करा व मा. जिल्हाधिकारी यांना विनंती आहे की, आपण कायद्याचे रक्षत आहात तर सुधारित ईआयए चे ग्रामपंचायत वाचन करण्यात यावे. ग्रामसभा मासिक सभा घेऊन अहवाल वाचन करावे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १६) | ही अरबिंदो रिअलिटी ही बांधकाम क्षेत्रातील कंपनी आहे. या कंपनीला भारत सरकारने सन २०२१ मध्ये पहिला ब्लॉक दिलेला असून त्यांनी यापूर्वी उत्खनन व खाणीचे काम केलेले नाही. भद्रावती व वरोरा तालुक्यात ८० टक्के कोळसा खाणी आहेत. वे.को.लि.मध्ये वैद्यकीय सुविधा देण्यात येत असून त्यांच्या वैद्यकीय समितीमध्ये बरेच दवाखाने आहेत. या कंपनीला कोळसा खाणीचा अनुभव नसताना हा करार झाला कसा? या ठिकाणी स्थानिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण होणार असून कंपनीतर्फे आरोग्य विषयक कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी. कंपनीच्या पॅनलमध्ये कोण-कोणत्या दवाखान्यांचा समावेश आहे, कि फक्त प्राथमिक आरोग्य केंद्रांमार्फत स्थानिकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात येणार आहे. वे.को.लि.तर्फे कामगाराच्या परिवाराला देखील आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत नि:शुल्क वैद्यकीय सेवा देण्यात येते. कंपनीतर्फे स्थानिकांना कोणत्या वैद्यकीय सेवा देण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. कंपनीने सांगितल्याप्रमाणे या ठिकाणी राज्य शासनाच्या कामगार कायद्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. केंद्रीय कायदा व राज्याच्या कायद्यामध्ये फक्त रू. २०००/- ते रू. ४०००/- | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कामगारांना कर्मचारी राज्य विमा महामंडळाची सुविधा देण्यात आली असून काही कामगारांना कॅशलेस वैद्यकीय सेवेचे कार्ड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ज्या प्रकल्पग्रस्त लोकांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यात येणार आहे, त्यांना देखील नोकरी लागल्यानंतर या सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. आपण काही वेळापूर्वी सांगितले की आपण देखील नोकरदार आहात. परंतु आपणास असे का वाटते की, कंपनी या सर्व बाबींविरोधात विचार करत आहे. या पुढे जे काही कामगार असतील त्यांना कॅशलेस मेडीकल कार्डची सेवा उपलब्ध केली जाईल. त्यामध्ये विशिष्ट आजारांकरिता देखील सुविधा उपलब्ध करण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | चा फरक असतो. कंपनीने सांगितले की, स्थानिकांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार वेतन देण्यात येईल. कंपनीतर्फे बऱ्याच चांगल्या गोष्टी करण्यात येत आहेत. परंतु वैद्यकीय सेवा ही देखील महत्त्वाची बाब आहे. कंपनीतर्फे स्वत:चे मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल उभारण्यात येणार काय व स्थानिकांना वैद्यकीय सेवा त्यामार्फत देण्यात येईल काय? जर या जनसुनावणीला परवानगी मिळाली तर आम्ही शांत बसणार नाही. माझी मा. अध्यक्षांना विनंती आहे की, जर कंपनी प्रशासनातर्फे आमच्या प्रश्नांची उत्तरे मिळत नसतील तर ही जनसुनावणी आत्ताच रद्द करण्यात यावी. हे काम आमच्या गरीब मुलांना मिळायला पाहिजे. तसेच एखाद्या व्यक्तिला हृदयाच्या आजार, यकृताच्या आजार अशा मोठ्या आजाराची लागण झाल्यास त्यांना या आजारांकरिता सेवा उपलब्ध होतील काय? | |
| १७) | या कंपनीच्या संचालक मंडळावर एक महिला आहे. त्यामुळे भारत सरकार जर सबसिडी कंपनीला मिळत असेल तर त्याचा येथील शेतकऱ्यांनाही मिळाला पाहिजे. गेल्या २० वर्षांपासून पर्यावरण जाहीर जनसुनावणी संदर्भात काम करत आहोत बरेच अनुभव आलेले आहेत. त्या अनुभवातून एक दिसते की प्रकल्प बाधितांना काही प्रश्नांची उत्तरे मिळतच नाही. प्रकलपबाधित हे बाधितच राहतात. त्यांना न्याय मिळतच नाही. आम्ही पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाकडे पाठपुरावा करताना असे दिसते की बरेच बदलही झालेले आहेत. आम्ही हरित लवाद पश्चिम विभागासाठी करण्याचा पाठपुरावा केला व त्यानंतर केंद्र शासनाने राष्ट्रीय हरित लवाद पुण्यात सुरू केला. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १८) | जगात अस एकच देश आहे की जो जमिनीला माय, माता, भूमाता म्हणतो आणि या मातेवर कोळशाच्या खाणीमुळे जो अन्याय होत आहे यास आम्ही बलात्कार असे समजतो असे अन्याय या चंद्रपूर जिल्ह्यातच बरेच होत आहेत. आमच्या यवतमाळ जिल्ह्यातही होत आहेत. देशाच्या विकासासाठी ऊर्जेची गरज आहे. मात्र त्या ऊर्जेसाठी जर शेतकऱ्यांचा जीव घेणार असणार तर तिचा उपयोग काय? | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| १९) | आपण प्रदूषणाचा विचार केला तर देशात पहिल्या पाच प्रदूषित शहरात चंद्रपूरचा नंबर लागतो. या शहराचे तापमान हे ४५-४६ सेल्सिअस होते. तरी येथे कोळसा खाण, ऊर्जा प्रकल्प, सिमेंट प्रकल्प आहेत किती तरी ऊर्जा प्रकल्प आहेत. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| २०) | अध्यक्ष महोदय पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी विनंती केली की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांना ही बाब निदर्शनास आणून देण्यात यावी की प्रकलप परिघाच्या १० कि.मी. वाघांची हालचाल जी शेड्यूल१ मध्ये येते. बेंगॉल मॉनिटर्ड लिझाड, शेड्युल १, मोर शेड्युल १, शेड्युल २ मधील वन्यजीव, पर्यावरण सल्लागार यांनी ईआयएमध्ये बेंगॉल मॉनिटर्ड लिझार्ड शेड्युल २ मध्ये दाखविण्यात आलेला आहे तर कार्यकारी सारांश अहवालात बेंगॉल मॉनिटर्ड लिझार्ड हे शेड्युल १ मध्ये दाखविलेला आहे. अशी दिशाभूल ते करत असतात. जर बेंगॉल मॉनिटर्ड लिझार्ड शेड्युल १ मध्ये आहे तर तो शेड्युल १ मध्ये दाखवला पाहिजे. सदरहू पर्यावरण सल्लागार हे ईआयएमध्ये एक व कार्यकारी सारांश अहवालात दुसरे लिहितात जनतेकडे संपूर्ण ईआयए अहवाल जातच नाही. शिवाय ईआयए अहवाल हा इंग्रजीत कसला तर अशा चुकीच्या गोष्टी करू नयेत. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| २१) | त्याचप्रमाणे राखीव वने (Reserved Forest) बाबत त्यांनी नीट पाहावे कारण भांदक राखीव वन स्लोरी राखीव वन व शेगाव राखीव वन हे प्रकल्प परिघाच्या १० कि.मी. अंतरावर येते या तिन्ही राखीव वनाच्या कॉरिडॉरमध्ये वाघांची हालचाल आहे असे प्रवर मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य Principal Chief Conservator of Forest (Wildlife) Maharashtra State पत्रात सांगतात, सदरील पत्र सर्वांसमोर वाचण्यास सांगितले, मात्र पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, कार्यकारी सारांश अहवालात वन्यजीव व वन नाही असे सांगून लोकांची दिशाभूल करत आहे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| २२) | भारतीय राज्यघटना कलम २१ नूसार प्रत्येकाला जगण्याचा हक्क देतो तर प्रकल्प प्रवर्तक स्थानिक लोकांचे जीवन बरबाद करण्यासाठी प्रकल्प करत आहेत. त्यांनी सांगितले की प्रकल्पातील कोळसा वाहतूकीमुळे रस्ते खराब होतात व अपघातात स्थानिकांचा मृत्यू होतो. त्याचे प्रकल्प व्यवस्थापनाला काहीही नाही. या जिल्ह्यात जर नाकात बोट घातले तर बोट काळे होऊन बाहेर येते, एवढे कोळशाचे प्रदूषण या जिल्ह्यात आहे. त्यांनी पुढे सांगितले की या व इतर जिल्ह्यात असे झालेले आहे की कंपनी चालु करतात व नंतर ४-५ वर्षांनी दुसऱ्याला जास्त पैसे घेऊन विकत देतात. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| २३) | सदरहू प्रकल्प हा विविध नियमांचे उल्लंघन करून म्हणजेच पर्यावरण कायदा, वन व वन्यजीव कायदा, खाण व खाणी उत्खनन कायदा या कायद्याचे उल्लंघन आहे. तरी जर यांना अनुमती मिळाली तर ते कलम २१ चे उल्लंघन होईल. वरील बाबीचा विचार करून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा ही विनंती. सन २०२२ मध्ये या कंपनीने पर्यावरण मंजूरी शासनाची फसवणूक करून मिळवलेली आहे. त्यावेळेस प्रशासनातर्फे कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही. कंपनीच्या प्रतिनिधींनी दिलेल्या माहितीनूसार कार्यवाही झाली नाही तर प्रशासनातर्फे कंपनीच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर फसवणूकीची कार्यवही करणार काय? कंपनीने जशी सन २०२२ मध्ये फसवणूक केली त्याचप्रमाण यावेळी देखील फसवणूक करणार आहे. याबाबत माहितीच्या अधिकाराअंतर्गत माहिती मागविण्यात येईल. सर्व सरपंचांनी आपणाकडे ठराव सादर केले आहेत. ग्रामसभेच्या ठरावाला केराची टोपली दाखविण्यात येते. शासक म्हणून आमचे मालक अध्यक्ष असून याबाबत निर्णय घेण्याचा अधिकारी आपणांस आहे. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, कंपनीने आश्वसनांची पूर्तता न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार करण्यात यावी. त्या तक्रारीवर नियमानूसार निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. |
| २४) | मा. अध्यक्षांकडून हीच अपेक्षा होती. सदर प्रकल्प पुढील ५० वर्षांपर्यंत चालणारा आहे आणि या १२ गावातील प्रत्येक नागरीकाला जरी नोकरी दिली तरी कंपनीला ते कमी पडणार आहे. या प्रकल्पामध्ये ८० टक्के स्थानिक नागरीकांना नोकरी मिळालीच पाहिजे. या क्षेत्रातील तरूण उच्चशिक्षीत असून कोण M.Tech, B.Tech, करून आहे. अशा तरूणांना कंपनीच्या प्रशासनामध्ये अधिकारीच्या पदाची संधी देण्यात यावी. कंपनीने नोकर भरतीची जाहीरात प्रसिद्ध करावी व स्थानिकांना प्राधान्य द्यावे कारण स्थानिकांना स्थानिक समस्येचे पूर्ण ज्ञान असून समस्या सोडविण्यात मदत होते. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

## ८) अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर:-

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|

| | |
|---|---|
| १) | उपस्थितांना विनंती आहे की त्यांनी त्यांचे म्हणणे थोडक्यात मांडावे. आत्ताच श्री. आगलावे यांनी बरेच मुद्दे जसे की आरोग्य शिक्षण, नोकरी, जमीन संपादन हे मुद्दे उपस्थित केले असून त्या व्यतिरिक्त आणखी मुद्दे असल्यास ते थोडक्यात उपस्थित करण्यात यावे. |

**९) डॉ. अंकुश आगलावे, सामाजिक कार्यकर्ता, बोर्डा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या उद्योगामध्ये कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांनी तक्रार केली आहे की त्यांचे दोन-दोन महिन्याचे वेतन रोखण्यात येत असून वेतन देताना त्यामध्ये ५० टक्के कपात करण्यात येत आहे. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, कंपनीने काम करणाऱ्या कामगारांचे वेतन होणार नाही अशी भूमिका घेऊ नये. वेतनाबाबत योग्य तो तोडगा काढून सुरक्षा रक्षकांची समस्या सोडविण्यात यावी. |

**१०) श्री. हरिशचंद्र आसुटकर, उपसरपंच, ग्रामपंचायत जेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या गावात ७८६ लोकसंख्या असून १३६ कुटुंब आहे. त्यापैकी फक्त ४५ लोकांना रोजगार देण्यात आला आहे. जवळपास ७० भूमिहीन शेतमजूर आहेत. ते शेतीवर अवलंबून होते. जवळपास १०० एकर जमीन जेना, व सोमनाळा या गावातून संपादित करण्यात येत आहे. त्याच्या तुलनेत ४५ रोजगार हे अल्प प्रमाण आहे. शेतीवर अवलंबून असणाऱ्या भूमिहीन लोकांना रोजगार देण्यात यावा. शेतीकरिता बळीराजा पांदण शेत रस्ता योजनेमधून अधिभार ढिगाऱ्याचा वापर करून पांदण रस्ते तयार करण्यात यावे जेणेकरून आमच्या शेतीकडे जाण्याचा मार्ग मोकळा होईल. येथून पाण्याचा उपसा होत असल्यामुळे गावात पाणी पुरवठा योजना तसेच शेतच्या सिंचनाचे साधन जसे की बोरवेल आटलेले असून त्याकरिता योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्या. तसेच सीएसआर निधीतून शेतकऱ्यांना शेती उपयुक्त अवजारे व बियाणे देण्यात यावे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**११) श्री. निलेश बोधाले, प्रकल्पग्रस्त, जेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या जनसुनावणीदरम्यान प्रकल्पग्रस्त त्यांचे मुद्दे मांडत आहेत. त्याबाबत निर्णय आज होणार आहे की जनसुनावणी झाल्यानंतर होणार आहे याची माहिती देण्यात यावी. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपले मुद्दे थोडक्यात मांडावे कारण बरेच लोक त्यांचे मुद्दे उपस्थित करण्यासाठी वाट पाहात आहेत.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आधीच सांगितल्याप्रमाणे शासनाच्या नियमानूसार वेळोवेळी सर्व गोष्टींची अंमलबजावणी करण्यात येईल. |
| २) | कंपनी ज्या नवीन गोष्टींसाठी संमती दर्शवित आहे, त्या गोष्टींच्या अंमलबजावणीबाबत स्थानिकांना पूर्वसूचना देण्यात येईल किंवा प्रकल्पास उत्पादन घेण्याची परवानगी मिळून जाणार? मला असे वाटते की आधी अंमलबजावणी करण्यात यावी व त्यानंतर वाढीव उत्पादनाची परवानगी देण्यात यावी. या बाबीवर कंपनीचे व्यवस्थापन सहमत आहे काय? कंपनीला त्यांचा नफा जास्त ठेवायचा असल्यामुळे स्थानिकांना सुविधा देण्याचे टाळत आहेत. किमान वेतन अधिसूचनेनूसार देण्यात येत असलयाचे कंपनीचे म्हणणे आहे. कंपनीच्या जाहीरातीमध्ये जनकल्याण व सामाजिक उन्नतीबाबत बोलले जाते. तसे असल्यास कंपनीने किमान वेतन कायद्यानूसार वेतन देऊ नये. कंपनीने करारनाम्यामध्ये एचपीसी वेज बोर्ड मान्य केले आहे. आम्हाला एचपीसी वेज बोर्ड मान्य नसून कोल इंडीयाला जो एनसीडब्ल्यु वेज बोर्ड लागू आहे तो देण्यात यावा. आज माझा बालपणीचा मित्र माजरी वेकोलि मध्ये नोकरी करत असून त्याला मासिक वेतन रू. ८०,०००/- मिळत असून मला फक्त रू. २०,०००/- वेतन मिळत आहे. त्यामुळे एनसीडब्ल्यु नूसार वेतन देण्यात यावे. कर्मचाऱ्याच्या घरामध्ये कोणाला मोठे आजार झाल्यास कंपनीने रू. ३.० लक्षची वैद्यकीय विमा सुविधा पूरविलेली असून कर्मचाऱ्यांच्या वेतनातून मोठ्या प्रमाणात त्याच्या हप्त्याची कपात करण्यात येत आहे. जसे वे.को.लि.तर्फे त्यांच्या कर्मचाऱ्याना वैद्यकीय विमा सुविधा पूरविते तसे या कंपनीने करावे. तसेच ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी भमि अधिग्रहण होण्यापूर्वीपासून म्हणजेच ३ | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, मी स्वत: महिला असून ८ कंपन्याच्या मानव संसाधनाचे काम पाहते. आपणास कळविण्यात येते की, या कंपनीमध्ये देखील पॉश कायद्यानूसार समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याबाबत दर सहा महिन्यात प्रशिक्षण देखील देण्यात येते. जनसुनावणी झाल्यानंतर आपण माझी भेट घ्यावी. माझ्यातर्फे आपणांस पॉश कायद्याबाबत सविस्तर महिती देण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, रोजगार आणि प्रदूषणाबाबत कंपनीने नियोजन करावे. |

| | | |
|---|---|---|
| | ते ४ वर्षांपासून काम करत आहेत अशा कर्मचाऱ्यांना कंपनीने पत्र देण्याचे केंद्र शासनाचे नियम आहेत. कंत्राटी कामगारांना ३ किंवा ५ वर्षांनूसार कायमस्वरूपी रोजगारात कंपनीने सामावून घ्यावे. वरिष्ठ पदावरच्या अधिकाऱ्यांना व कनिष्ठ किंवा कंत्राटी कर्मचाऱ्यांना समान सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या. जसे की अधिकऱ्यांकरिता वातानुकूलित कॅबिन तयार करण्यात येते. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांना देखील वातानुकूलित शेतडची सुविधा पूरविण्यात यावी जेणेकरून उन्हाळ्यामध्ये कर्मचाऱ्यांना तापमानाचा त्रास होणार नाही. सहा माहिन्याच्या अनुपालन अहवालामध्ये बऱ्याच अटी व शर्तीचे पालन होत असल्याचे दाखविण्यात येते परंतु प्रत्यक्षात अनुपालन होत असल्याचे दिसून येत नाही. कंपनीच्या आत कर्मचाऱ्यांना मास्क लावणे बंधनकारक असून त्याचे अनुपालन करण्यात येत नाही. ज्या ठिकाणी १० पेक्षा जास्त कर्मचारी आहेत त्या ठिकाणी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ नूसार समितीची नेमणूक करणे बंधनकारक आहे, परंतु त्याचे देखील अनुपालन करण्यात आले नाही. सदर समितीमध्ये महिला कर्मचाऱ्यांचा समावेश असणे गरजेचे आहे. मी येथे कोणाला विचारले तर या ठिकाणी याबाबत कोणी उत्तर देतील असे मला वाटत नाही. फक्त धोरण असून चालणार नाही त्याची प्रभावी अंमबजावणी होणे गरजेचे आहे. किलोनी फाट्यावूरन येताना एम्टाच्या ट्रक्समुळे प्रदूषण होत आहे. या कंपनीच्या कर्मचाऱ्यांना प्रदूषणाचा त्रास होत असून त्याबाबत उपाययोजना करावे. कंपनीने त्यांच्या कर्मचाऱ्यांचा फायदा होईल याकडे लक्ष द्यावे. | |

**१२) श्री. आकाश वानखेडे, तंटामुक्ती अध्यक्ष, ग्रामपंचायत कढोली, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या कंपनीत २०२२ मध्ये जनसुनावणी झाली. त्यामध्ये त्यांना १.५ दशलक्ष टनची पर्यावरण मंजूरी मिळाली. त्यामधील भरपूर गोष्टींची पूर्तता झालेली नाही. या प्रकल्पाला विरोध नाही. विद्यमान पर्यावरण मंजरी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्रातील अत्यावश्यक पर्यावरण अटींचे प्रत्यक्षात अनुपालन | मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, ही कंपनीची जबाबदारी आहे. कंपनीला त्याचे उत्तर देण्याची संधी द्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | झालेले नसताना प्रकल्पाची उत्पादन क्षमता वाढविण्याची मान्यता देण्यात येऊ नये. विद्यमान पर्यावरण अटींची स्वतंत्र संयुक्त तपासणी करून अनुपालन निश्चित करावा व त्यानंतर निपटाऱ्याचा विचार करावा. आमच्या नाल्या व नदीमध्ये मोठ्या प्रमाणात माती आहे. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्वत: पंचनामा केला होता. मी त्याबाबत काही दिवसांपूर्वी तक्रार केली होती. आपल्या कंपनीला सन २०२२ मध्ये नाला वळविण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. तो नाला न वळवता पूर्णपणे बुजविण्यात आले व त्याच्या दुसऱ्या बाजूने डंपिंगची जागा बनवून वाहतूक सुरू केली. पहिला पाऊस आल्याबरोबर या क्षेत्रातील १० गावांना जोडणारा रस्ता पूर्णपणे बंद झाला. त्यामुळे गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली. आम्हाला मानव म्हणून जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. कंपनीकडून जनावरांसारखी वागणूक करण्यात येऊ नये. अधिभार ढिगारे नाल्यामध्ये वाहून गेल्यामुळे नाल्याची वहन क्षमता कमी झाली आहे. आपण ज्या रस्त्याने येथे आलात त्याच्या शेजारी कोंढा नाला वाहत असून हाच नाला पुढे वाहत जातो. सदर नाला ब्लॉक झाला असून अधिभार ढिगाऱ्यामुळे त्याचे रुपांतर नाली मध्ये झाले आहे. आपल्या विभागामार्फत कंपनीला नाला स्वच्छ करण्याचे निर्देश देण्यात यावे. किलोनीच्या काही शेतकऱ्यांची शेती या नाल्याच्या वरच्या भागाला आहे. ६ महिने पाऊस असल्याने शेतकऱ्यांना पूर्वतयारी करावी लागते. बियाणे, खत व निघालेल्या सोयाबीन व कापूस या पिकांची साठवणूक करून ठेवण्यात येते. कंपनीतर्फे नाल्यामध्ये पाणी सोडल्यामुळे शेतीतून निघणाऱ्या पिकांची वाहतूक करणे शक्य होत नाही. कंपनीने ठिक-ठिकाणी पाईप टाकून तात्पूरत्या रस्त्याची सोय करून द्यावी. म.प्र.नि. मंडळाच्या संमतीपत्रानूसार अधिभार ढिगारे फक्त कचरा टाकण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी टाकायचे आहेत. त्याचे शास्त्रोक्त पद्धतीने पायरीकरण करण, ओव्हरबर्डनचा उतार क्षैतिज पातळीच्या संदर्भात २८° पेक्षा अधिक नसावा. स्थिरीकरणासाठी ओव्हरबर्डनवर योग्य प्रकारे वनस्पती आच्छादन (हरित आच्छादन) करण्यात यावे. या मुद्याबाबत कंपनीकडून कोणत्याही प्रकारची पूर्तता झालेली नाही. अधिभार ढिगाऱ्याचे ड्रोनक्षरे सर्वेक्षण करून त्याची घनता, ऊंची, उतार आणि नाल्यापासूनचे | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, गारलँड ड्रेन बनिविण्यात आले आहेत. आपण उपस्थित केलेल्या प्रदूषणाच्या मुद्यावर योग्य ती उपाययोजना करण्यात येईल. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून ज्या सूचना प्राप्त होतील त्याचे अनुपालन कंपनीतर्फे करण्यात येईल. कंपनी याबाबत जबाबदारी घेत आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, कंपनीने याबाबत अंतर्गत चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीच्या धोरणानूसार सदर अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल. सदर कार्यवाही आमच्या अंतर्गत धोरणानूसार करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | अंतर मोजण्यात यावे व त्याचा सविस्तर आढावा व अहवाल मला देण्यात यावा. याबाबत मी यापूर्वीच पत्र दिलेले आहे. त्यासोबत Catch Drain आणि Settling Pond मधून Soil, OB mineral dump मधून येणारी Silt & Sediment अढवण्याची अट आहे. याकरिता कंपनीने बँक हमी जमा केलेली आहे. परंतु कंपनीकडून याबाबत प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे यांची बॅक हमी तात्काळ जप्त करून कारवाई करण्यात यावी. आपल्या जीवनातील अविभाज्य घटक झाडे आहेत. प्राणवायुशिवाय आपण जगु शकत नाही. कंपनीने नर्सरीकरिताचे कंत्राट आमच्या प्रकल्पग्रस्त गावातील बचत गटांना द्यावा. कंपनीने बाहेरील महिलेला कंत्राट दिले असून त्याच्यातर्फे वेळेवर वेतन देण्यात येत नाही. तसेच स्थानिकांच्या समस्यांचे निराकरण देखील करण्यात येत नाही. स्थानिक बचत गटांना कंत्राट दिल्यास महिलांना रोजगार मिळेल व त्यांच्या समस्यांचे वेळेवर निराकरण करणे शक्य होईल. तसेच नर्सरीमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या वेतनात देखील वाढ करण्यात यावी. ज्या महिला एक वर्षापासून काम करत आहेत त्यांना कायमस्वरूपी करण्यात यावे व नवीन नियुक्त्यांना देखील एक वर्षानंतर कायमस्वरूपी करण्यात यावे. खाणीच्या व्यवस्थापकांवर सर्वप्रथम गुन्हा दाखल करण्यात यावा कारण त्यांच्या चुकीमुळे नाला ब्लॉक झाला होता. पावसाळा सुरू झाल्यानंतर देखील त्यांनी नाल्यामध्ये माती टाकून ठेवली होती. नाला ब्लॉक झाल्यामुळे मोठी जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली होती. याबाबत श्री. द्विवेदी यांचेकडून उत्तर अपेक्षित आहे. आम्ही कायद्यानूसार वागणारे नागरिक आहोत. आम्हाला फक्त या मुद्याबाबत उत्तर अपेक्षित आहे. सदर व्यक्ति अधिकारी असून खाणकाम त्यांच्या अखत्यारीत येते. त्यांना माहिती आहे की, खाणकाम कसे करावे, कोणाकडून कसे काम कवून घ्यायचे याबाबत त्यांना ज्ञान आहे. डीजीएमएस च्या नियमानूसार खाणकम कसे करायचे, पर्यावरणीय परवानगी कशी मिळवायची, Geological सर्वेक्षण कसे करायचे याबाबत माहिती आहे. मला श्री. द्विवेदी यांचेकडून उत्तर अपेक्षित आहे. खाणीच्या पहिल्या वर्षात नाला वळविण्याबाबत पर्यावरणीय मंजूरीमध्ये सांगण्यात आले होते. कंपनीतर्फे अधिभार ढिगारे नाल्याच्या दुसऱ्या बाजूला टाकण्यात | |

आले आहे. जेना गावाच्या सीमारेषेपर्यंत आपल्या खाणीचे काम सुरू असून आपण खाणकाम पुढे गेले नाही असे कसे म्हणू शकता. जमीनीच्या आतून घातक वस्तु निघतात याबाबत पर्यावरण भिगाला देखील माहिती आहे. ते अधिभार ढिगारे नाल्याच्या शेजारी टाकण्यात येऊन असे निर्देश देण्यात आले आहेत. कंपनीच्या एका चुकीमुळे भद्रावतीच्यानागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. खाणीच्या अधिभार ढिगाऱ्यातून खनिज निघत असून कोंढा नाल्याद्वारे वर्धा नदीत मिसळते. वर्धा नदीद्वारे भद्रावती शहराला पाणी पुरवठा करण्यात येतो. खाणीच्या माध्यमातून नकळतपणे वर्धा नदीचे पाणी प्रदूषित होत असून हा खूप मोठा गुन्हा आहे. आपल्या खाणीमुळेच सदर नाला बंद झाला असल्याचा अहवाल म.प्र.नि. मंडळाने दिलेला आहे. उप-प्रादेशिक कार्यालयाच्या क्षेत्र अधिकारी यांनी दि. २३/०६/२०२६ रोजी झाल्या पावसामुळे नाल्याला पूर आल्याबाबत चौकशी केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष मौका पाहणी दरम्यान असे निदर्शनास आले की मे. औरो इन्फ्रा प्रा.लि., (अरबिंदो रीयालिटी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.), टाकळी जेना (उत्तर) व टाकळी जेना (दक्षिण) कोल माईन,मौजा बेलोरा, ता. भद्रावती, जि.चंद्रपूर या ठिकाणापासून उत्तर दिशेकडुन एक लोकल नाला वाहत येत असल्याचे आढळून आले. कंपनीचे म्हणणे आहे की, त्यांना नाला वळवायचा नाही. परंतु पाहणी करणारे अधिकारी यांचे म्हणणे आहे की, नाला उद्योगाच्या परिसरातून वाहत आहे. तो नाला उत्तर दिशेकडून दक्षिण दिशेला कोळसा खाणीच्या परिसरातून दक्षिण दिशेला वाहत जाऊन पुढे तो कोंढा नाल्याला मिळतो. त्या नाल्यावर दोन ठिकाणी बंधारे बांधलेले आढळले. त्यापैकी एक सिमेंट कॉंक्रीट केलेला बंधारा व दुसरा मातीने मे. औरो इन्फ्रा प्रा. लि., (अरबिंदो रीयालिटी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.) या कंपनीने ट्रक वाहतुकीसाठी तयार केलेला होता असे तेथील नागरिकांनी सांगितले तसेच कंपनीच्या प्रतिनिधीनेसुद्धा सांगितले.तो बंधारा नसून वाहतुकीसाठी कंपनीने सिमेंट पाईप माती टाकून पुल तयार केलेला होता असे नागरिकांनी व कंपनी प्रतिनीधीने सांगितले. आपण नदीला माता म्हणतो तरी देखील आपल्या कंपनीने नाला बंद केला. त्यामुळे आपल्या कंपनीवर व जबाबदार अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल व्हायला हवा. या क्षेत्रात ७ जून पासून पावसाला सुरूवात

| | | |
|---|---|---|
| | होते. २३/०६/२०२६ पर्यंत आपले अधिकारी काय करत होते? कंपनी व्यवस्थापन सदर अधिकाऱ्याला पाठीशी घालून वाचविण्याचा प्रयत्न करत आहे. मी याबाबत पोलिस स्टेशन भद्रावती, जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ चंद्रपूर येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. तसेच मा. महसूल मंत्री यांचेकडून देखील तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत मा. महसूल मंत्री यांनी याबाबत ऑनलाईन बैठक घेतली होती. परंतु आजपर्यंत गुन्हा दाखल झाला नाही म्हणून आज आम्ही परत मागणी करत आहे. भारतीय न्याय संहीत २८५ अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी धोकादायक अडथळा निर्माण करता येत नाही. त्यांना याबाबत माहिती असून देखील नाला बुजविण्यात आला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत होणार असल्याची त्यांनी माहिती होती. कंपनीने त्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी अन्यथा कंपनीने त्या अधिकऱ्याला निलंबित करावे. आम्हाला श्री. द्विवेदी यांचेकडून उत्तरे अपेक्षित आहे की, त्यांनी कोणाच्या सांगण्यावरून हे कृत्य केले आहे. सदर अधिकाऱ्यावर किती दिवसात कार्यवाही होणार आहे याची माहिती देण्यात यावी. येथे उपस्थित नागरीकांची देखील हीच मागणी आहे. जर मा. जिलहाधिकारी यांच्यासमोर कंपनी मुजोरीने वागत असेल तर स्थानिकांसोबत कशी वागणूक होत असेल याचा विचार करण्यात यावा. मा. जिल्हाधिकारी यांनी कंपनीला उत्तर देण्याचे आदेश द्यावे. कंपनीच्या धोरणानूसार आपणच सांगितले असेल की सदर नाला बंद करण्यात यावा. त्यानूसार आपल्यावर कारवाई होणार काय? पुढील ७ दिवसांत आपल्या कंपनीकडून मला लेखी उत्तर देण्यात यावे. आपण या ठिकाणी एक उदाहरण द्यावे की या कंपनीमध्ये कोणच्याही दबावाखाली काम केले जात नाही. त्यादिवशी एखाद्या व्यक्तिचा मृत्यू झाला असता तर कंपनीने त्याची जबाबदारी घेतली असती काय? | |
| २) | गावामध्ये पाण्याची पातळी खालावलेली असून बोअरवेलला पाणी नाही. खाण सुरू करण्यापूर्वी व खाण सुरू झाल्यानंतर पाण्याची पातळी मिती खालावलेली आहे याचा अहवाल तयार करून पूर्ण गावासमोर जाहीर करावा. किशोरी सामेश्वर शेरकी ही महिला कंपनीत काम करीत असताना प्रसूती रजेवर गेल्यानंतर तिचा सेवा संपविण्यात आली आणि तिला पुन्हा कामावर घेतले जात | मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, उपस्थितांना विनंती आहे की ज्यांना मौखिक सुचना द्यायचा असतील तर त्यांनी ती द्यावी. तसेच लेखी स्वरूपात देखील सुचना व आक्षेप घेण्यात येत आहेत. आपल्या सर्व मुद्यांची |

| | | |
|---|---|---|
| | नसल्याची तक्रार आहे. तसेच तिचे ६ महिन्याचे वेतन देखील देण्यात आले नाही. सदर महिलेने वारंवार विनंती करून देखील तिला कामावर घेतले नसल्याची तक्रार आहे. त्या महिलेला येत्या सोमवारपर्यंत कामावर रूजू करण्यात यावे. सदर महिलेचया नेकरीमुळे तिच्या कुटुंबाचे उदर्निर्वाह करणे शक्य होईल. तसेच तिचे ६ महिन्याचे व फेब्रुवारी पासून ऑगस्टपर्यंतचे वेतन एकत्र देण्यात यावे. तसेच सदर महिलेला किती दिवसात नोकरीवर रुजू करून घेण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. तसेच श्री. वाकुडकर यांचे कुटुंब २० वर्षांपासून वास्तव्यास असून या क्षेत्रातील मोठे जमीनधारक जसे की, मत्ते, सातपुते यांचेकडे शेतमजूरी करत आहेत. त्या शेतमजुरांचे आपल्या कंपनीकडून कोणतेही सर्वेक्षण करण्यात आले नसून त्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला देण्यात आलेला नाही. या २-३ कुटुंबांकरिता रू. २५.० लक्ष प्रमाणे मोबदला देण्यात यावा. आपल्या कंपनीमध्ये ३५०-४०० कामगार कंत्राटी पद्धतीवर काम करत आहेत. सदर कामगार बेलोरा, टाकळी, जेना, कढोली व जवळपासच्या इतर गावातील आहेत. जे कामगार मागील १ वर्षांपासून काम करत आहेत त्यांना कायमस्वरूपी करण्यात यावे. त्यांचे वेतनामध्ये सुधारणा करण्यात यावी, त्यांना सुविधा देण्यात याव्या. तसेच कंत्राटदारांना कामगारांचे नियमित वेतन करण्याचे आदेश देण्यात यावे. कंपनीने आमच्या गावातील लोकप्रतिनिधींना हाताशी घेऊन करार पुनर्वसन व पुनस्थापना धोरणानूसार बनविलेला आहे. त्यामध्ये मा. उपविभागीय अधिकारी, कंपनीचे अधिकारी, सरपंच यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. त्यामध्ये जमीन कोणत्या दिवशी घेणार व कशा पद्धतीने घेणार याची माहिती त्यामध्ये आहे. तसेच त्यामध्ये रू. २६.० लक्षप्रमाणे जमीन घेण्यात येईल व नोकरी देण्यात येईल. स्थानिकांना त्यांच्या इच्छेनूसार जमीन देण्याचे कबूल करण्यात आले होते. ज्या स्थानिकांनी कागदपत्रे दिली त्यांची जमीन आजपर्यंत घेण्यात आली नाही. बेलोरा व जेना गावातील पूर्ण जमीन देखील घेण्यात आली नाही. आतापर्यंत कंपनीने फक्त ३५० एकर जमीन खरेदी केली असल्याचे माहितीच्या अधिकाराअंतर्गत सांगण्यात आले आहे. खाण लीज क्षेत्राबाहेरील जमीन भारत सरकारने कंपनीला दिली. सदर जमीन स्थानिक शेतकऱ्यांनी १२०००/- ते १५०००/- नूसार डागा कॉलरीज या उद्योगाला | नोंद जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये घेण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | दिली होती. सदर जमीन डागा कॉलरीज बंद झाल्यानंतर शेतकऱ्यांना नियमानूसार परत मिळायला पाहिजे होती. तसे न करता भारत सरकारने या खाणीच्या नावाने ट्रान्स्फर केली व कंपनीने भारत सरकारच्या दरानूसार रू. १० ते १२ लक्षप्रमाणे शुल्क भरले. वे.को.लि. तर्फे आमच्या गावात रू. ३०.० लक्षप्रमाणे मोबदला द्यायला तयार आहे व त्याची प्रक्रिया सुरू आहे. आमची जमीन १२००० ला घेऊन भारत सरकारला रू. १२.० लक्षप्रमाणे देण्यात आली व तीच जमीन आता रू. ३०.० लक्षप्रमाणे वे.को.लि.ला विकण्यात येईल. यामध्ये मोठा घोळ आहे. कंपनीने १४२ हेक्टर क्षेत्रातील सर्व जमीनधारकांना उर्वरित रू. १४.० लक्ष प्रमाणे मोबदला वितरीत करावा. कंपनीसोबत संघर्ष केल्यानंतर त्यांना नोकऱ्या मिळाल्या. बेलोरा गावाचे पुनर्वसन नियमानूसार व करारनाम्यानूसार तात्काळ करावे. गावाचे पुनर्वसन झाल्यानंतर गावामध्ये आशा वर्करची गरज असणार नाही. कंपनीला विनंती आहे की, त्यांनी अशा वर्करला त्यांच्या वैद्यकीय विभागात नोकरी द्यावी. | |

## १३) श्री. रोहीत काकडे, बेलोरा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी जमीन सर्व्हे क्रं.६ बेलोरा गावात आहे. कंपनीच्या नकाशामध्ये माझे एक एकर शेती सीमारेषेवर आहे. कंपनीचे म्हणणे आहे की त्यांच्यातर्फे फक्त एक एकर जमीन अधिग्रहीत करण्यात येईल. उर्वरित दोन एकर जमीनीचे मी काय करू. माझ्या शेतात जाण्यासाठी मला पर्यायी मार्ग उपलब्ध नाही. माझी कंपनीला विनंती आहे की, मला शेतात ये-जा करण्यासाठी रस्ता बांधून देण्यात यावा तसेच घराचे बांधकम देखील करून द्यावे. कंपनीने नकार दिल्यास न्यायालयामध्ये दाद मागण्यात येईल. कंपनीचे अधिकारी माझ्या घरी जमीन घेण्याकरिता आले होते व त्या बदल्यात नोकरी देण्याचे आश्वासन दिले होते. त्यावेळी माझी शेती विकण्याची तयारी नव्हती. परंतु आज माझी तयारी असल्याने कंपनी पूर्ण शेत घेण्यास टाळाटाळ करत आहे. कंपनीतर्फे ६६,३३,०००/- इतका मोबदला देण्यात येत आहे. शासनाच्या नियमानूसार रू. ३ ते ५ कोटी मोबदला मिळायला पाहिजे. तसेच याबाबत कोणीही | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपली जमीन घेण्यास कंपनी तयार आहे.<br><br>मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, वैयक्तिक मुद्यांबाबत कंपनीच्या अधिकाऱ्यांनी स्थानिकांशी संपर्क साधावा व त्यांना जमीन खरेदीची प्रक्रिया समजवून सांगावी. कंपनीला सूचना आहे की, गावकऱ्यांशी संपर्कात राहून त्यांच्या समस्या सोडविण्यात याव्या.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आपणांस जमीनीच्या मोबदल्यात जी नोकरी मिळेल ती समान असेल. |

| | | |
|---|---|---|
| | उत्तर देण्यास तयार नाही. मी स्वत: कंत्राटदार असून माझ्या कामगारांना रू. २५०००/- मासिक वेतन देत आहे. परंतु कंपनीतर्फे फक्त रू. २०,०००/- मासिक वेतन देण्यात येते. भविष्यात वे.को.लि.ची खाण प्रस्तावित असल्याने जमीन वे.को.लि.ला देण्यात येईल असे कंपनीतर्फे सांगण्यात येते. कंपनीचे म्हणणे आहे की त्यांना वे.को.लि.ला स्वस्त दरामध्ये जमीन द्यावी लागणार आहे. कंपनी पुढील ५ वर्षांनंतरच्या नूकसानीबाबत बोलत असून माझ्या वर्तमानात झालेल्या नूकसानीबाबत काहीच बोलत नाही. माझी संपूर्ण ३ एकर जमीन कंपनीने विकत घ्यावी व त्याच्या दरामध्ये सुधारणा करण्यात यावी. मी स्वत: एक इंजिनिअर असून मला माझ्या शैक्षणिक अर्हतेनूसार नोकरी देण्यात यावी. मी आत्ताच माझी नोकरी सोडली कारण कंपनीने मला पुढील दोन महिन्यात नोकरी देण्याचे आयवासन दिले होते. | |

**१४) श्री. अनिल वैद्य, बेलोरा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावातील जमीन अधिग्रहीत केल्या आहेत. स्थानिक लोकांची दिशाभूल करण्यात आली आहे. माझ्या गावातील महिलांना वेतन देण्यात यावे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**१५) श्री. प्रदिप महाकुलकर, सरपंच, ग्रामपंचायत पानवडाळा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या जनसुनावणी दरम्यान इतकेच सांगणे आहे की, मी माझ्या पानवडाळा गावाचा विषय मा.जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी यांच्यापर्यंत पोहोचविलेला आहे. आजपर्यंत ३-४ व्यक्तिंच्या व्यतिरिक्त कोणालाही रोजगार मिळालेला नाही. कंपनीला लागणाऱ्या जमीनीचे निम्मे क्षेत्र आमच्या पानवडाळा ग्रामपंचायतीच्या हद्दीत आहे. कंपनीने सीएसआरच्या माध्यमातून चांगले काम केले आहे. कंपनीतर्फे असेच काम होत राहावे अशी मी अपेक्षा करतो. कंपनीतर्फे देण्यात येणाऱ्या जमीनीचे रू. २६.० लक्ष प्रमाणे दर आम्हाला न परवडणारे आहे. स्थानिक लोक जमीनीचे दर रू. २२.० ते २५.० लक्षप्रमाणे | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | मागत आहेत. जमीनीचा मोबदला खूप कमी मिळत आहे. जमीनीचा दर वाढविण्याबाबत विचार व्हावा. कंपनीतून निघणारे अधिभार ढिगारे ग्रामपंचायतींना मोफत देण्यात यावे. कंपनीकडे मागणी केली असता त्यांनी १०-२० डंपर अधिभार ढिगारे दिलेले आहेत. कंपनीचे म्हणणे होते की अधिभार ढिगाऱ्याच्या वाहनांना दंड आकारला जाऊ शकतो. कंपनीतर्फे अधिभार ढिगारे देण्यात आले असते तर पांदण रस्ते चांगले झाले असते. | |

**१६) श्री. प्रविण नारायण ठेंगणे, माजी सभापती, पंचायत समिती भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | दि. १६/०९/२०२५ रोजी शासनाच्या मध्यस्थीने जो करार करण्यात आला त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे गरजेची होती. ती झालेली नाही. त्यामध्ये प्रकल्पाकरिता लागणाऱ्या जमीनीचे संपादन दि. १६/०९/२०२६ पर्यंत करवयाचे होते. अनेक शेतकऱ्यांमध्ये तफावती असून त्या योग्य आहेत. कंपनीने प्रस्ताव दिला होता की जे शेतकरी रू. २६.० लक्षपर्यंतची जमीन द्यायला तयार आहेत अशा शेतकऱ्यांची जमीन घ्यायला तयार आहेत. त्यामध्ये बळजबरी करण्या येणार नाही. ज्या शेतकऱ्यांना रू. २६.० लक्ष दर परवडणारा नाही. परंतु काही तांत्रिक व आर्थिक अडचणीमुळे दि. १६/०९/२०२६ पर्यंत घेणे शक्य झालेले नाही. दि. १६/०९/२०२६ नंतर ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी संपादित करावयाच्या आहेत त्या शेतकऱ्यांशी वाटाघाटी करून त्यांच्या जमीनी संपादित करायला पाहिजे. खाणीमुळे शेतकऱ्यांना प्रदूषणाचा त्रास होणार आहे. जो भाव कंपनीने प्रस्तावित केला होता तो आता शेतकऱ्यांना मान्य नाही. कंपनीने शासनाच्या मध्यस्थीने वाटाघाटी करून संपादित कराव्या. सदर करारामध्ये तफावतीची रक्कम पूर्वीच्या शेतकऱ्यांना देण्याची तरतूद आहे. त्याशिवाय कंपनी ३.० दशलक्ष टन उत्पादन साध्य करू शकणार नाही. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| २) | बेलोरा गावाचे पुनर्वसन अतिशय संथ गतीने सुरू आहे. या देशामध्ये कोळसा खाण प्रकल्पाकरिता जमीन संपादित करताना कोणत्याही प्रकल्पधारकाने इतक्या मोठ्या प्रमाणात मोबदला दिलेला नाही. त्याबाबत मी कंपनीचे | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आभार मानतो. पुनर्वसनाची प्रक्रिया जलद गतीने झाली पाहिजे. वे.को.लि. देखील इतक्या तात्काळ पुनर्वसन करत नाही. कंपनीने १५०-१७५ लोकांना पुनर्वसन मोबदला दिलेला आहे. उर्वरित लोकांना देखील कंपनीने लवकरात लवकर मोबदला द्यावा कारण आपली खाणी ही गावाच्या २०० मीटर अंतरापर्यंत पोहोचलेली आहे. गावाचे पुनर्वसन केले नाही तर खाणीचे विस्तारीकरण होऊच शकत नाही. | |
| ३) | करारानूसार जे प्रकल्पग्रस्त नोकरीस पात्र असतील अशा युवकांना एक महिन्याच्या आत कंपनीने नोकरी देण्याचे मान्य केले आहे. परंतु असे निदर्शनास येत आहे की, पुनर्वसनामध्ये ज्या लोकांची घरे संपादित केले आहेत अशा लोकांना ४ महिन्यांनंतर देखील नियुक्तिपत्र देण्यात आलेले नाही. सदर विषय अत्यंत गंभीर असून येणाऱ्या आठवड्याभरात त्यांना कंपनीमध्ये रूजू करून घेण्यात यावे. किलोनी, बेलोरा, जेना, कान्सा या गावांसमोरून जो रस्ता गेलेला आहे, सदर रस्ता व नाला वळविण्यापूर्वी त्या क्षेत्रातील संपूर्ण जमीन संपादित करणे आवश्यक आहे. कंपनीला विनंती आहे की स्थानिकांना विश्वासात घेतल्याशिवाय व शासनाची परवानगी घेतल्याशिवाय परिसरातील कोणत्याही नाल्याचे, रस्त्याचे, शेत-शिवारातील पांदण रस्त्याचे वळतीकरण करण्यात येऊ नये. खाणीच्या दाटीवाटीच्या परिसरामुळे सभोवतालच्या परिसरामध्ये पाणी साचत असून तसेच अधिभार ढिगाऱ्यांवर वृक्षारोपण न केल्यामुळे उन्हाळ्यामध्ये धुळ उडत असून लगतच्या परिसरातील शेतपिकांचे नूकसान होत आहे. आजपर्यंत या कंपनीने शेतपिकांची नूकसान भरपाई दिलेली नाही. परंतु कायद्यामधील तरतूदीनूसार कोणत्याही प्रकल्पामुळे शेतीचे नूकसान होत असेल किंवा रस्त्यांचे व नाल्याचे नूकसान होत असल्यास त्याची नूकसान भरपाई देणे अनिवार्य आहे. त्याबाबत आपण कार्यवाही केली पाहिजे. गावाला जोडणाऱ्या रस्त्यांवर कंपनीची वाहतूक होत असल्यामुळे त्या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. कंपनीने तात्काळ प्रकल्पबाधित क्षेत्रातील रस्त्यांचे दुरूस्तीकरण किंवा नूतनीकरण करण्यात यावे. तसेच याबाबत सीएसआर निधीतून काही तरतूद करता येते असल्यास त्याची शक्यता तपासण्यात यावी. खाणीतून निघणाऱ्या रसायनयुक्त पाण्यावर प्रक्रिया केल्याशिवाय सोडण्यात येऊ नये. हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीतर्फे सांगण्यात आले की, सीएसआर निधीअंतर्गत रू. १.० कोटींचा खर्च करण्यात आला. परंतु हा अत्यल्प निधी असून आजपर्यंत केलेल्या उत्पादनानूसार जो खर्च कंपनीने करायला पाहिजे होता तो खर्च केलेला नाही. उत्पादनानूसार कंपनीने प्रकल्पबाधित गावांमध्ये सीएसआर निधी खर्च केला पाहिजे. कुठल्याही ग्रीनफिल्ड प्रकल्प किंवा खाण प्रकल्पामध्ये HEMM कामगारांची कमतरता असते. कंपनीने सुरूवातील ७० प्रशिक्षीत ऑपरेटरला बाहेरून आणले. त्यांचे वेतन स्थानिकांपेक्षा जास्त आहे. परंतु स्थानिक ऑपरेटर व बाहेरच्या ऑपरेटरचे वेतन हे समान देण्यात यावे. खाणीच्या सुरूवातीच्या काळात आमच्याकडे HEMM ऑपरेटर उपलब्ध नव्हते परंतु आजच्या परिस्थितीत आमच्याकडे HEMM ऑपरेटर उपलब्ध आहेत. कंपनीने या क्षेत्रामध्ये HEMM प्रशिक्षण केंद्र उभारले तर ते स्थानिकांच्या फायद्याचे ठरणार. तसेच बेरोजगार युवकांना चांगले कौशल्य मिळेल. त्यामुळे स्थानिक युवकांना पीसी ऑपरेटर, डंपर ऑपरेटर, HEMM ऑपरेटर, व्हाल्वो ऑपरेटर या पदावर रुजू होतील. याबाबत कोणत्याही प्रकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. कंपनीने याकरिता या क्षेत्रात सल्लागार नियुक्त केले पाहिजे. आज या क्षेत्रातील युवक हेल्पर या पदावर कंपनीला कामाला लागतो व काही तडजोड करून तो ऑपरेटर या पदापर्यंत पोहोचतो. कंपनीने जर प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली तर आमचा युवक हा थेट HEMM ऑपरेटर या पदावर रूजू होऊ शकतो. सदर खर्च सीएसआर अंतर्गत करण्यात यावा. प्रकन्पबाधित गावातील बेरोजगारांचा सर्वात मोठा विषय आहे. या ठिकाणी धुळ आम्ही खातो, प्रकल्प आमच्या जमीनीवर येणार आहे. परंतु प्रकलपबाधित गावांमधील बेरोजगारांना नोकरी न मिळता परप्रांतीय व्यक्तिंना रोजगार मिळत आणि स्थानिक युवक रोजगारासाठी फिरत असेल तर ही स्थानिकांसाठी दुर्भाग्याची गोष्ट आहे. कंपनीमध्ये ज्या प्रकारे या कोळसा प्रकल्पामध्ये महिलांना रोजगार देण्यात आलेला आहे त्याप्रकारे कोणत्याही प्रकल्पामध्ये देण्यात आले नाही. त्याबाबत कंपनीचे अभिनंदन. कंपनीने स्थनिकांना सुरूवातील रोजगारात प्राधान्य दिले. परंतु ३ वर्षांपासून कंपनीने स्थानिकांना रोजगार दिलेला नाही. कंपनीने सर्व प्रथम स्थानिकांना रोजगारामध्ये प्राधान्य | |

| | | |
|---|---|---|
| | द्यावे. पूर्वी कॅप्टीव्ह कोळसा खाणींची संकल्पना नव्हती फक्त शासनाच्या कोळसा खाणी होत्या. राष्ट्रीय कोळसा वेतन करारानुसार कोल इंडिया मधील वेतन निश्चिती करण्यात येते. ते कोल इंडीयाच्या कामगारांसाठी लागू असून इतर कोळसा खाण प्रकल्पांसाठी लागू नाही. कालांतराने वे.को.लि.मध्ये देखील बाह्ययंत्रणेद्वारे कामगारांची नेमणूक करण्यास सुरूवात झाली व बाह्य यंत्रणेद्वारे कामगारांना वेतन मिळायचे. मुळात किमान वेतनाचे धोरण हे कोळसा खाण कामगारांसाठी नाहीच. ना केंद्र शासनाचे ना राज्य शासनाचे किमान वेतन धोरण कोळसा खाणीतील कामगारांसाठी लागे आहेत. सदर वाद अनेक दिवसांपासून सुरू असल्यामुळे कोल इंडीया, कोळसा मंत्रालय, कामगार मंत्रालय व संघटनांनी पर्यायी मार्ग म्हणजे उच्चाधिकार समितीच्या शिफारशीनूसार वेतन निश्चिती केली. एचपीसी व्हेजेस म्हणजे कोल इंडीयाद्वारे देण्यात येणारे वेतन व किमान वेतन यांचा भागाकार केल्यानंतर येणारे वेतन म्हणजे एचपीसी व्हेजेस. म्हणजे जे किमान वेतन देण्यात येत आहे ते या कामगारांना लागू होत नाही. नियमानूसार कंपनी एचपीसी व्हेजेस पेक्षा कमी वेतन देऊ शकत नाही. प्रकल्पग्रस्त स्थानिक कामगारांचे एक वर्षाचे प्रशिक्षण संपल्यानंतर त्यांना एचपीसी व्हेजेस नूसार वेतन देण्याबाबत कंपनीने लिहून दिलेले आहे. परंतु माझे त्याचबरोबर हे मत आहे की, कंपनीने बाह्ययंत्रणमार्फत काम करणाऱ्या कामगारांकरिता देखील एचपीसी व्हेजचे पालन केले पाहिजे. बाह्य यंत्रणेमार्फत काम करणाऱ्या कामगारांचे शोषण करणे अपेक्षित नाही. कारण ते लोक जास्त काम करतात. त्यांच्याकडे कौशल्य असल्याने त्यांना कामावर ठेवण्यात आले आहे. कायमस्वरूपी कामगार व बाह्ययंत्रणेमार्फत काम करणारे कामगार यांच्या वेतनातील तफावत दूर झाली पाहिजे. कंपनीला हा खाणपट्टा केंद्र शासनाने भाडे तत्त्वावर दिला असल्याने कंपनी जमीनीचे मालक नाही. कोणतीही कंपनी जमीनीची मालक होत नाही. तुम्हाला सदर जमीन ३० वर्षांकरिता भाडे तत्त्वावर दिली आहे. तुमच्याकडून अनुपालन झाल्यानंतर जमीन शासनाकडे हस्तांतरीत करण्यात येते. डागा कंपनी सेंट्रल कॉलरीची जी जमीन होती ती शासनाने अवार्ड घोषित करून अधिग्रहीत केली होती आणि ज्या उद्देशासाठी जमीन अधिग्रहीत केली होती तो उद्देश गाठला गेला नाही. | |

| | | |
|---|---|---|
| | सदर जमीन शासनाने अधिग्रहीत केल्यामुळे शेतकऱ्यांचा मालकी हक्क संपला. कायद्याच्या नियमानूसार शासनाने अधिग्रहीत केलेल्या जमीनीचा उद्देश साधला जात नसेल तर सदर जमीन दिलेला मोबदला परत घेऊन ती शेतकऱ्यांना परत देण्याची तरतूद आहे. त्याच आधारे सेंट्रल कॉलरीजच्या १६ कामगारांना या कंपनीने स्थायी स्वरूपाची नोकरी दिली त्याबाबत कोणाचाही आक्षेप नाही. १२७ हेक्टर जमीनीच्या मालकी हक्क असणाऱ्या शेतकऱ्यांचा विचार करून शासनाने मध्यस्थीकरून त्यांना किमान अनुदान देण्यात यावे कारण त्या जमीनी रू. १०,०००/- ते १२,०००/- या दराने अधिग्रहीत करण्यात आलेल्या आहेत. कंपनीने देखील शासनाकडून मिळालेल्या जमीनीचा मोबदला शासकीय दरानूसार केलेला आहे. माझी ही मागणी शासनाला आहे. या कंपनीमध्ये जो कामगार कामाला येतो त्याची मद्यपान तपासणी केली जाते. त्यामुळे कामगारांच्या मद्यपानावर निर्बंध लागले आहेत. सदर नियम सर्व उद्योगांमध्ये लागू करण्यात यावे. ज्ञानेश्वर नन्नावरे नावाच्या कर्करोगाच्या रूग्णाला कंपनीने कामावर रूजू करून घ्यावे. कर्करोगासारख्या गंभर आजाराने गस्त रूग्णांची कंपनीने मदत केली पाहिजे. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कनिष्ठ अधिकाऱ्यांवर निर्बंध असणे गरजेचे आहे. या कंपनीला कोळसा मंत्रालयाकडून कोळसा खाण सुरळीत चालविल्याबाबत पारितोषिक मिळाले आहे. माझे कंपनीला सांगणे आहे की, स्थानिकांच्या समस्या सोडविल्याशिवाय आपले पर्यावरण साधणार नाही व खाणीचे विस्तारीकरण देखील करता येणार नाही. प्रकल्पग्रस्तांच्या वास्तविक समस्या कंपनीने प्राधान्याने सोडवायला पाहिजे. कंपनीला जरी ३ दशलक्ष टनची परवानगी मिळाली तरी प्रकल्पधारकांना जमीनीची आवश्यकता आहे. सर्वप्रथम कंपनीने जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण करावी, गावाचे पुनर्वसन करावे तसेच कंपनीने करारातील दायित्वे पूर्ण करून खाणकाम सुरू करावे. सदर खाण गावकऱ्यांनी सुरू केलेली खाण आहे. सर्वप्रथम गावकऱ्यांच्या कंपनीने सोडवाव्या. मी माझे लेखी निवेदन मा. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर तथा मा. जिलहाधिकारी यांचेकडे सादर करत आहे. या पूर्वी कंपनी सुरू करताना ग्रामपंचायतींसोबत वेळोवेळी बैठका व्हायच्या त्या कंपनीकडून बंद करण्यात | |

| | | |
|---|---|---|
| | आलेल्या आहेत. कंपनीने प्रकल्पग्रस्तांसोबत संवाद साधला नाही तर प्रकल्पग्रस्तांच्या अडचणी कंपनीला कळणार नाही. त्यामुळे कंपनीला विनंती आहे की, शासनस्तरावर किंवा कंपनीस्तरावर प्रकलपग्रस्तांच्या बैठका होणे गरजेचे आहे. तसेच प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाचा मोबदला देताना दिरंगाई होत आहे. त्यामध्ये एकनिष्ठता व पारदर्शकता येणे गरजेचे आहे. तसेच प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जनावरांचे स्थलांतर करण्याचा मोबदला मिळाला पाहिजे. कंपनीमध्ये निर्माण होणाऱ्या रोजगारामध्ये महिलांचा समावेश कमी असून त्याकडे देखील कंपनीने लक्ष द्यावे. स्थानिक महिला बचत गटांना रोजगाराची संधी कंपनीने द्यावी आणि उर्वरित बेरोजगरांना तात्काळ सामावून घेण्यात यावे. | |

१७) **<u>सौ. पुजा गजानन पिंपळकर, जेना, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जनसुनावणी आधी आहे की कोळसा उत्खननाचा परवाना आधी मिळत आहे याची माहिती देण्यात यावी. कंपनीला जी जमीन मिळालेली आहे, त्या जमीनीतून कोळसा उत्खनन करण्याकरिता परवानगी मिळाली होती से कंपनीचे म्हणणे आहे. त्याची काही कालमर्यादा असते. आपले म्हणणे आहे की, कोळशाचे उत्खनन कंपनीने केले आहे. श्री. प्रविध्ण ठेंगण यांच्या म्हणण्यानूसार कंपनीने ३ वर्षांनंतर सर्व व्यवस्थित काम केले असून त्यानंतर कोळशाचे उत्खनन केले आहे. परंतु माझे असे म्हणणे आहे की, याच कंपनीने ३ वर्षापूर्वी श्री. गजानन पिंपळकर, रमेश पंडीले, रा. बेलोरा व श्री. सुरेश देहारकर यांनी याच कंपनीचे कोळशाचे वाहन थांबविल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा नोंदविला होता. माझ्याकडे त्याबाबतचा पुरावा असून खोटी माहिती कंपनी देत आहे की मी देत आहे. कंपनीला काम बंद करण्याबाबत पर्यावरण विभागाकडून नोटीस मिळाली असेल. कंपनीच्या प्रतिनिधींना याबाबत माहिती असायला पाहिजे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, सदर जनसुनावणी ही विस्तारीकरण प्रकल्पासाठी असून या कंपनीला १.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष कोळसा उत्खननाची परवानगी पूर्वीच मिळालेली असून आता ३.० दशलक्ष टन प्रतिवर्ष वाढीव उत्पादन क्षमतेसाठी जनसुनावणी घेण्यात येत आहे. पर्यावरणाची परवानगी व म.प्र.नि. मंडळाचे संमतीपत्र मिळाल्याशिवाय कोळशाचे उत्खनन करण्यात येत नाही.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, सदरील व्यक्तिंना बोलावून कंपनीने त्यांच्या समस्या सोडवाव्यात. |
| २) | कंपनीच्या म्हणण्यानूसार त्यांना कोळसा उत्खननाची परवानगी मिळाली असली तरी सदर परवानगी बेकायदेशीर आहे. माझ्या माहिती प्रमाणे कोणत्याही कंपनी कोणत्याही प्रकारचे कंत्राट देताना ते पूर्ण करण्याचा | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पूर्वी याच ठिकाणी डागा कॉलरीज या नावाने कोळसा उत्खनन करणारी कंपनी कार्यरत होती. या कंपनीने शासनाच्या सर्व नियमांचे पालन करून व |

| | | |
|---|---|---|
| | कालावधी देण्यात येतो. या कंपनीला कोळसा उत्खनन करण्यासाठी काही कालावधी निश्चित करून देण्यात आला असेल. तीन वर्षापूर्वी या कंपनीने कोळसा उत्खनन सुरू केले होते व त्याला विरोध करणाऱ्या ३ व्यक्तिंची विचारपूस न करता त्यांच्यावर बेकायदेशीरपणे कंपनीने गुन्हा दाखल केला आहे. म्हणजे नागरीकांनी विरोध केल्यानंतर कंपनीतर्फे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येणार काय? शासनाने कंपनीला कोळसा उत्खननासाठी दिलेल्या कालावधीबाबत वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित का करण्यात आले नाही. कंपनीचे म्हणणे आहे की त्यांनी शासनाच्या नियमांचे पालन करून कोळसा उत्खनन केले आहे. पंरतु माझ असे म्हणणे आहे की, आपल्या कंपनीने शासनाच्या कोणत्याही नियमांचे पालन न करता फक्त स्थानिकांवर गुन्हा दाखल करण्याचे काम केले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी मिळाल्यानंतर किंवा जनसुनावणी झाल्यानंतरच कोळसा उत्खननाची परवानगी मिळते. तसेच कंपनीला मिळालेल्या कालावधीबाबत कंपनीने कोणतेही प्रकाशन केलेले नाही. गावकरी जेव्हा प्रकल्पाचा विरोध करतात तेव्हा त्यांचा छळ करतात व त्यांच्यावर कायद्याच्या दुरूपयोग करून गुन्हे दाखल करण्यात येतात. | शासकीय प्रक्रिया पूर्ण करूनच कोळशाचे उत्खनन केले आहे व करण्यात येत आहे. शासनाचे धोरणांचे पालन करूनच कोळसा उत्खनन करण्यात येत आहे. कोळसा उत्खनन थांबविण्याबाबत आम्हाला शासनाकडून कोणते निर्देश प्राप्त झालेले नाही. |
| ३) | या कंपनीमध्ये ४-५ महिन्यापूर्वी श्री. मनोज ठेंगणे यांचा कार्यादेश रद्द करण्यात आला होता. त्यानंतर मा. आ. श्री. सुधीरजी मुनगंटीवार यांची कोळसा खाणीला भेट झाली असता त्यांनी स्थानिकांना काम मिळण्याचे आश्वासन दिले होते. परंतु कंपनीतर्फे फक्त जमीन अधिग्रहण केलेल्या व्यक्तिंना रोजगार मिळालेला असून आणखी बऱ्याच नागरीकांना रोजगार मिळालेला नाही. सदर बेरोजगार युवक रोजगाराच्याअभावी व्यसनाधीन होत आहेत. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, कंपनीने प्रकल्पग्रस्त गावांमध्ये सर्वेक्षण करावे व त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनूसार स्थानिकांच्या कंपनीच्या गरजेनूसार रोजगारात प्राधान्य द्यावे.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर सुचनेचे पालन करण्यात येईल. |
| ४) | सदर कंपनीमधून निघणाऱ्या निविदा या फक्त राजकारणाशी संबंधित असणाऱ्या व्यक्तिंनाच मिळत आहे. अन्य व्यक्तिंनी कुठे जायचे? माझ्या पतीने मागील ९ महिन्यांमध्ये २-३ वेळा याबाबत कंपनीला विचारले असून मला याबाबत कंपनीकडून उत्तर मिळाले नाही. कंपनी जर राजकारण्यांनाच निविदा देणार असतील स्थानिकांचा त्यामुळे फायदा कसा होणार. कंपनीच्या प्रशासनातील अधिकाऱ्यांनी स्थानिकांच्या समस्या सोडविण्याकरिता पूर्णवेळ उपस्थित राहायला पाहिजे. गाव | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आमचा शेती आमची खाणीमध्ये अधिग्रहीत होणार आणि काम फक्त राजकारण्यांना मिळणार हा कुठला न्याय आहे. माझ्या पतीला कंपनीतर्फे काम न देण्याची कारणे सांगता आले नाही व सद्य:स्थितीत काम उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. कंपनीचा सर्वसाधारण लोकांची हेळसांड करण्याचा उद्देश असल्याचे साध्य होत आहे. | |
| ५) | ज्यांची घरे कंपनीने अधिग्रहीत केलेली आहेत अशा व्यक्तिंना ३ महिन्यांच्या कालावधीनंतर देखील कंपनीमध्ये नोकरी देण्यात आलेली नाही. याबाबत देखील माझ्याकडे पुरावे आहेत. सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर देखील कंपनीतर्फे नोकरी देण्याकरिता ३ महिने टाळाटाळ करण्यात येते. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कागदपत्रांची पूर्ण प्रक्रिया झाल्यानंतर नियुक्तिपत्र देण्यात येईल. यामध्ये जवळपास ३०-४० प्रकरणे अशी आहेत ज्यामध्ये कागदपत्रांची पूर्तता पूर्ण झालेली नाहीत. जर एखाद्या परिवारामध्ये चार व्यक्ती असतील तर अशा प्रकरणांमध्ये सर्वांकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची गरज असते. कागदपत्रांची पूर्तता झाल्याबरोबर तात्काळ कंपनीतर्फे नोकरी देण्यात येईल. |
| ६) | जेना गावातील रस्ता वळविणे शक्य नसल्याने कंपनीने जेना गावाचे पुनर्वसन करावे व उत्खनन सुरू करावे. कंपनीतर्फे अवैधपणे उत्खनन होत असल्याबाबतचे पुरावे माझ्याकडे आहेत. कंपनीतर्फे जेना, कान्सा, बेलोरा या गावातील विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा पुरविण्यात आली होती. त्याच्या उद्घाटनासाठी मा. करण देवतळे, आमदार हे आले होते. परंतु त्यानंतर मानव संसाधन मंत्री यांच्यासोबत मे. अरविंदो या कंपनीच्या अवैध उत्खननाबाबत बैठकीदरम्यान प्रस्तावना देत असल्याबाबत प्रस्तावना देण्यात येत असल्याचा व्हिडीओ माझ्यापर्यंत पोहोचला. एकीकडे आमदार कंपनीच्या अवैध उत्खननाबाबत माहिती देतात तर दुसरीकडे स्थानिकांनी या विरोधात आंदोलन केल्यास त्यांना अटक करण्यात येते. जेना गावाचे पुनर्वसन तात्काळ करण्यात यावे त्यामुळे आमचे आरोग्य होणार नाही व कंपनीच्या प्रदूषणामुळे आजारांची लागण होणार नाही. तसेच आम्हाला पाण्याची टंचाई भासणार नाही. मला माझ्या निविदा प्रक्रियाबाबतच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. कंपनीतर्फे जर राजकारण्यांनाच कंत्राट द्यायचे असेल तर स्थानिक व्यक्तिंनी रोजगार कसा मिळवायचा. तसेच कंपनी स्थानिकांचे मुल्य का करत नाही याची माहिती देण्यात यावी. कंपनीतर्फे मागील एक वर्षापासून विस्तारीकरण होत असल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, कंपनीने स्थानिक गावकऱ्यांच्या समस्या सोडविण्याकडे लक्ष द्यावे. तसेच गावकऱ्यांसाठी भेटण्याची वेळ निश्चित करण्यात यावी व त्याबाबत प्रसिद्धीपत्रक प्रकाशित करण्यात यावे. कंपनीने स्थानिकांच्या समस्यांबाबत धोरण निश्चित करावे व त्यानूसार गावकऱ्यांच्या समस्या सोडवाव्या.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर सूचनेचे पालन करण्यात येईल. तसेच गावकऱ्यांसाठी आठवड्यातील एक दिवस निश्चित करण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी विचारले की, निविदा प्रक्रियेचे पालन होत आहे किंवा कसे याबाबत माहिती देण्यात यावी.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीतर्फे आतापर्यंत जुन्या खाणीमधील कंत्राट देण्यात आले असून विस्तारीकरणामध्ये निघणाऱ्या |

| | | |
|---|---|---|
| | विस्तारीकरणाची व्याख्या काय आहे याची माहिती देण्यात यावी तसेच एक वर्षापासून विस्तारीकरण का करण्यात आले नाही याची कारणे देखील सांगण्यात यावी. राष्ट्रीय हरीत लवादाच्या कायद्यानूसार सदर कंपनीला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय कोळशाचे उत्खनन करता येत नाही. यानंतर देखील कंपनीने कोळशाचे अवैध उत्खनन सुरू ठेवलेले आहे. याविरूद्ध मा. राष्ट्रीय हरीत लवाद यांचेकडे तक्रार करण्यात येणार आहे. आम्हाला याच ठिकाणी न्याय मिळाल्यास राष्ट्रीय हरीत लवादाचे दार ठोठावण्याची गरज भासणार नाही. | कामांचे कंत्राट देताना स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी विचारले की, कंपनीतर्फे सर्व नियमांचे पालन करण्यात यावे. |

## १८) श्री. वासुदेव विधाते, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | गेल्या अनेक वर्षांपासून पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ व २००९ च्या तरतूदीनूसार खाण प्रकल्प, राज्यमार्ग प्रकल्प व इतर औद्योगिक प्रकल्पांसाठी जनसुनावणी घेण्यात येते. भारतीय संविधानाच्या अनुच्छे २१ नूसार प्रत्येक भारतीयाला जिवीताचा हक्क दिलेला आहे. यामध्ये पर्यावरणाचा देखील समावेश करण्यात आलेला आहे. या चंद्रपूर जिल्ह्याच्या प्रदूषणाचा आपण एकंदरीत विचार केला तर चंद्रपूर जिल्हाच नाही तर लगतच असलेला यवतमाळ जिल्ह्यातील वणी व झरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात खाण प्रकल्प, औद्योगिक प्रकल्प, सिमेंट प्रकल्प आणि वीज निर्मिती प्रकल्प कार्यरत आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे दरवर्षी करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणामध्ये चंद्रपूर जिल्ह्याचा संपूर्ण देशामध्ये पहिल्या १० प्रदूषित शहरांमध्ये समावेश असतो आणि हे गेल्या अनेक वर्षांपासून दिसून येते. या प्रदूषणामुळे पर्यावरण व आरोग्यावर मोठ्या प्रमाणात परिणाम होते. तसेच ज्या शेतकऱ्यांची जमीन कोणत्याही प्रकल्पांमध्ये अधिग्रहीत करण्यात येत नाही अशा शेतकऱ्यांच्या होणाऱ्या पिक नूकसानीबाबत शासनस्तरावर कोणत्याही प्रकारचे धोरण आजपर्यंत तयार करण्यात आले नसल्याबाबत खेदाने या ठिकाणी सांगावे लागत आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील जनतेसाठी धोरण निश्चिती होणे फार गरजेचे आहे. तसेच भारतीय | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | संविधानाच्या अनुच्छेद ३९ (ब) नूसार जल, जंगल, जमीन कोळसा आणि सर्व प्रकारच्या नैसर्गिक संपदेचा मालकी हक्क कोणत्याही कंपनीकडे नसून सार्वजनिक आहे. सर्व समुदायाचा हक्क त्या संपत्तीवर आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३९ (ब) ची अंमलबजावणी राज्य शासनाने करावी याकरिता आम्ही वारंवर पाठपुरावा करत आहोत. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. माझा प्रश्न आहे की, हा खाणपट्टा जो शासनाने कंपनीला वाटलेला असून ती कंपनी येथे कार्यरत झाली आहे व त्याचे विस्तारीकरणाबाबत जनसुनावणी सुरू आहे. श्री. याकूब दास व इतर, प्रकरण क्रं. ९ SCC ७२५ मध्ये सन २०१३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने केरळ येथील शेतकऱ्यांच्या विरोधात निर्णय दिला होता. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांनी सवोच्च न्यायालयात दाद मागितली व सन २०१३ मध्ये मा. सवोच्च न्यायालयाने असा निकाल दिला की, जर जमीनीच्या भूगर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे खनिज आढळल्यास त्याचा मालकी हक्क त्या खनिज संपत्तीवर जमीन धारकाचा मालकी हक्क असतो असे स्पष्टपणे म्हटले आहे. यासंबंधाने मी अनेक निवेदने चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ जिलहाधिकारी कार्यालय यांचेकडे व मा. मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्रालयाकडे सादर केलेले आहेत. प्रशासनातर्फे सर्वोचच न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करण्यात येत आहे. याबाबत सातत्याने सन २०१३ पासून पाठपुरावा करून देखील शासनातर्फे याकडे दुर्लक्ष करत आहे व अशा प्रकारे जी जमीन कोट्यावधी किंमतीची आहे ती काही लाखांमध्ये विकल्या जाते. आम्ही या खनिज संपत्तीचे मालक असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे प्रकरण क्रं १०SCC१/२०२४ मिनरल्स एरिया डेव्हेलपमेंट अथॉरिटी वि. स्टील अथॉरिटी ऑफ इंडीया या प्रकरणामध्ये ९ न्यामूर्तींच्या घटनापीठाने देखील उपरोक्त प्रकरणाप्रमाणे निर्णय दिलेला आहे. प्रशासनाने या निर्णयाचे पालन केले पाहिजे. परंतु गेल्या दोन वर्षांपासून आम्ही याबाबत पाठपुरावा करत असून त्याकडे देखील दुर्लक्ष करण्यात येत आहे. ते देखील मान्य केले जात नाही. त्यामुळे देखील शेतकऱ्यांचे नूकसान होत आहे. कोणत्याही प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणामध्ये शेतकऱ्यांचीच जमीन अधिग्रहीत केली जाते व खनिज देखील त्याच जमीनीमध्ये मिळत असल्याने त्याचा | |

| | | |
|---|---|---|
| | मालकी हक्क शेतकऱ्यांचाच आहे. त्यामुळे जमीनीचा मोबदला हा गौण मुद्दा आहे. परंतु ज्या जमीनीखाली खनिज संपत्ती आहे त्या खनिज संपत्तीचा मोबदला आम्हाला कंपनीने किंवा शासनाने का देऊ नये हा माझा स्पष्ट प्रश्न आहे. त्यामुळे शासनाकडून या कंपनीला हा खाणपट्टा कोणत्या कायद्याखाली आवंटीत करण्यात आलेला आहे याचे उत्तर मला अपेक्षित आहे. मला माझ्या प्रश्नांची उत्तरे मिळाली किंवा नाही मिळाली तरी चालेल. मी आपल्या जनासुनावणीच्या इतिवृत्तांचे अवलोकन करून घेईल. मागील २० वर्षांपासून झालेल्या जनसुनावण्यांमध्ये आजपर्यंत समाधानकारक उत्तरे प्रशासनाकडून, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून किंवा प्रकल्प प्रवर्तकांकडून मिळालेले नाहीत. या कंपनीला कोणत्या कायद्यानूसार खाणपट्टा आवंटीत झाला हा माझा पहिला प्रश्न आहे. आणि दुसरा प्रश्न असा की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानूसार भूगर्भातील खनिज संपत्तीचा मालकी हक्क हा त्या शेतकऱ्याचा असल्याचा निर्णय दिलेला असताना शेतकऱ्याला फक्त रू. २६.० लक्षच मोबदला का देण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालयाने देखील सांगितले आहे की, जिथे कुठे कायदा नाही त्याठिकाणी खनिज संपत्तीचा मालकी हक्काबाबत कायद्यामध्ये तरतूद नसेल त्या ठिकाणी कायद्यानूसार मान्य केला जाईल. जर हक्काबाबत शासनाचा कोणती कायदा बोलत नाही, कोणताही कायदा उपलब्ध नसल्यास त्या खनिज संपत्तीचा मालकी हक्क त्या जमीनधारकांचा राहणार असे स्पष्टपणे यामध्ये म्हटले आहे. सदर खाण पट्टा हा कोळसा खाणी (विशेष तरतुदी) अधिनियम, २०१५ अंतर्गत कंपनीला आवंटीत झालेला आहे. कंपनीतर्फे कोळसा धारण करणारे क्षेत्र (संपादन व विकास) अधिनियम, १९५७ नूसार या ठिकाणच्या कोळशाचा मालकी हक्क हा शासनाकडे असल्याचा प्रतिदावा करण्यात येऊ शकते. कोळसा धारण करणारे क्षेत्र (संपादन व विकास) अधिनियम, १९५७ नूसार जमीनीचा व कोळशाचा अधिकार जरी शासनाकडे असला तरी सेक्शन १० हा फक्त कोल इंडीयाच्या खाणींनाच लागू होतो. कोळशाच्या साठ्यांचा मालकी हक्क शासकीय कंपन्यांना असला तरी खाजगी कंपन्यांना अधिकार नाही. कोळसा धारण करणारे क्षेत्र (संपादन व विकास) अधिनियम, १९५७ च्या कलम १० नूसार कोल इंडीया | |

| | | | |
|---|---|---|---|
| | सारख्या कंपन्यांना उत्खनन करायचे असल्यास तेथे स्वामित्व हक्क सरकारचा आहे. हे फक्त कोळसा धारण करणारे क्षेत्र (संपादन व विकास) अधिनियम, १९५७ मध्ये म्हटले आहे, परंतु याबाबत स्वतंत्र कायदा आजपर्यंत या देशात अस्तित्वात नाही. ही कंपनी येथे आली, जमीनीचा भाव दिला, शासनाने परवाने दिले, या सर्व गोष्टींमुळे कंपनी कोळशाचे मालक झालेत काय हा माझा प्रश्न आहे. माझा स्पष्टपणे आक्षेप आहे की या भूगर्भातील कोळशाचे मालक शासन किंवा कंपनी नसून स्थानिक शेतकरी आहेत. त्यामुळे रू. २६.० लक्षपेक्षा जास्त किंमतीसाठी आपण सर्वांना लढा द्यावा लागेल. कंपनीतर्फे उत्तरात काय मिळते ते बघुच. मला संधी दिली त्याबाबत मी प्रशासनाचे आभार मानतो. आज या जनसुनावणीदरम्यान असे निदर्शनास आले की, काही लोकांना प्रकल्पामुळे आनंद होत आहे तर काहींना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे माझी प्रकल्प प्रवर्तकांना विनंती आहे की, जनतेला या प्रकल्पाच्या माध्यमातून जो काही लाभ देता येईल तो देण्यात यावा आणि जनतेचे नूकसान होणार नाही याकडे लक्ष द्यावे. या पूर्वी याच प्रकल्पाच्या झालेल्या जनसुनावणीदरम्यान मी उपस्थित होतो. त्यावेळी मी या परिसरामध्ये वाघांच्या अस्तित्वाबाबत मुद्दा उपस्थित केला होता. वाघांचे अस्तित्व या परिसरामध्ये असल्याबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मध्ये शेड्युल-१ मध्ये वाघाचा समावेश करण्यात आला आहे. वाघामुळे या क्षेत्रात गुरांवर व माणसांवर हल्ला झालेला आहे. या क्षेत्रामध्ये रानडुक्कर मोठ्या प्रमाणात व्यत्यय निर्माझ करत आहे. त्याकडे शासनाचे लक्ष नाही. या सर्व गोष्टींचा विचार केला तर येथील स्थानिक नागरीक पाटतिडकीने त्यांच्या समस्या मांडत आहेत. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचनेनूसार जनसुनावणीदरम्यान कोणालाही कितीही वेळ बोलता येते. मुद्दे उपस्थित करणाऱ्या व्यक्तिला कोणीही अडवू शकत नाही. या संदर्भात मा. उच्च न्यायालयाचा देखील निर्णय आहे. हे तुम्हाला बंद करता येणार नाही, मुद्दे परत परत मांडण्यास बंधन घालता येणार नाही. जर जनसुनावणी एका दिवशी संपत नसेल तर ती पहिल्या दिवशी स्थगित करून दुसऱ्या दिवशी सुरू करायची तरतूद पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेमध्ये आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | ४-५ दिवसांपूर्वी कंपनीने पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल गावांमध्ये पोहोचविला आहे. सदर अहवाल जनसुनावणीच्या ३० दिवसांपूर्वी संबंधित ग्रामपंचायतींमध्ये पोहोचणे गरजेचे होते. ४-५ दिवसात स्थानिक नागरीक कोणाकडे जाऊन समजून घेतील. सदर अधिसूचनेनूसार ३० दिवसांपूर्वी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल ग्रामपंचायतींमध्ये का पोहोचले नाही व त्यासोबत इंग्रजी वर्तमान पत्र व प्रादेशिक भाषेतील वर्तमान पत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आलेली जाहीरात सोबत जोडण्यात का आली नाही. यानूसार पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेचे या ठिकाणी उल्लंघन झाले आहे. त्यामुळे सदर जनसुनावणी रद्द करण्यात यावी असा माझा आक्षेप आहे. | |

१९) **सौ. ज्योत्सना मंगेश गोवर्धन, बेलोरा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावातील ५० टक्के घरे कंपनीने अधिग्रहीत केली असल्यामुळ काही घरांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित होत आहे. कंपनीने येणाऱ्या कालावधीमध्ये उर्वरित घरे अधिग्रहीत करावे तसेच उर्वरित घरांची जबाबदारी घ्यावी. उर्वरित घरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला कंपनी जबाबदार राहणार. उरलेल्या घरांची किंवा त्यांच्या सुरक्षेची कंपनी जबाबदारी घेणार आहे काय. याबाबत कंपनीने उत्तर द्यावे. कंपनीमध्ये ९० टक्के स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार नोकरी देण्यात यावी. तसेच बेलोरा गावाचे भद्रावती येथे स्थलांतर झाल्यानंतर कामावर ये-जा करण्याकरिता बसची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. कंपनीतर्फे सीएसआर अंतर्गत आरओ प्लांट बसविण्यात आले आहे, स्कुल बसची व्यवस्था, मोफत नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून दिली. आपातकालीन वेळेकरिता रूग्णवाहिकेची सुविधा देखील उपलब्ध आहे. कंपनी बंद असताना देखील आम्हाला वेतन देण्यात आले आहेत. कंपनीला विनंती आहे की, कंत्राटी कर्मचाऱ्यांना एचपीसी व्हेजेस लागू करण्यात यावे. आजच्या कार्यक्रमात आजूबाजतूच्या परिसरातील पुढारी तक्रारी, आक्षेप व सुचना नोंदवित असतील तर त्यांना महत्तव दिले जाते परंतु गोर-गरीब | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, कृपया आपले सर्व प्रश्न उपस्थित करावे. कंपनी प्रशासन सर्व प्रश्नांची एकत्रित उत्तरे देतील. |

| | | |
|---|---|---|
| | जनतेला कोणीही विचारत नाही व ऐकून घेत नाही. येणारा मोबदला फक्त पुढाऱ्यांना मिळतो. माझी विनंती आहे की, जो मोबदला आमचा आहे तो आम्हालाच देण्यात यावा. | |

२०) **श्री. प्रशांत मत्ते, बेलोरा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीच्या करारानूसार जमीनीच्या बदली ज्यांना घरे पाहिजे त्यांना घरे मिळाली ज्यांना मोबदला पाहिजे त्यांना मोबदला मिळाला. परंतु कंपनीने ३०-४० टक्के घरे घेऊन देखील आमची जागा सुनिश्चित झाली नाही. आम्ही बाहेर जागा घेतली, त्या जागेचे अकृषक आजपर्यंत प्रलंबित आहे. त्या ठिकाणी आम्हाला कंपनीने काही सुविधा करून द्यावी. तसेच ज्यांची घरे घेण्यात आली आहे त्यांच्यासाठी प्लॉटची व्यवस्था करावी. पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी पुनर्वसनाची जागा निश्चित होणे गरजेचे होते. पुनर्वसन झाल्यानंतर त्याकडे कोणी लक्ष देणार नाही. आम्ही १४ लोकांनी पूर्वीच मागणी केली होती की गावकऱ्यांनी निश्चित केलेल्या जागेवर आम्हाला देखील प्लॉट देण्यात यावा. परंतु कंपनी त्याकडे दुर्लक्ष करत आहे. पुढील ३-४ दिवसात सदर समस्येचे निराकरण न झाल्यास उपोषण करण्यात येईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आपल्या समस्येचे निराकरण होऊन जाणार. पुनर्वसनाच्या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून आपली समस्या सोडविण्यात येईल. आपल्या सर्व मुद्यांचे लेखी आश्वासन देण्यात येईल. |

२१) **श्री. विशाल प्रमोद दुधे, प्रकल्पग्रस्त, बेलोरा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी आज या सुनावणीत प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या वतीने अत्यंत स्पष्ट आणि कायदेशीर भूमिका मांडत आहे. यापूर्वी सन २०२२ मध्ये अशाच प्रकारची जनसुनावणी घेण्यात आली होती व त्या जनसुनावणीदरम्यान उपस्थित मुद्यांची कायदेशीरपणे पूर्तता झाल्याचे दिसून येत नाही. वारंवार जिल्हा प्रशासनाच्या मध्यस्थतेमध्ये त्याबाबत आढावा बैठका घेण्यात येत आहेत. आढावा बैठकीमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या काही मुद्यांवर कंपनीतर्फे चांगले काम करण्यात येत आहेत. केपीसीएलच्या तुलनेमध्ये या कंपनीतर्फे पर्यावरणाच्या क्षेत्रात काही कामे न सांगता करण्यात येत आलेले आहेत. कंपनीने | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | सीएसआर निधीच्या माध्यमातून काही उपाययेजना केलेल्या आहेत. तसेच कपीसीएलच्या तुलनेमध्ये चांगल्याप्रमाणात वेतनवाढ कंपनीर्तो देण्यात येत आहे. सर्वप्रथम माझा पहिला प्रश्न असा आहे की, या भागातील प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन, मोबदला, घरांचे प्रश्न, जीन व इतर वैधानिक पुनर्वसन लाभ पूर्णपणे मिळाले आहेत की, याची तपासणी जिल्हा प्रशासन व या जनसुनावणीशी संबंधित अधिकारी यांचेकडून होणे गरजेचे आहे. कारण १०० मीटर अंतरावर गाव बसलेले आहेत. १०० मीटर अंतरावर गाव असल्यामुळे ३.५ दशलक्ष टनाची परवानगी दिल्यामुळे परिस्थिती फार संवेधनशील होणार आहे. मला कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून काही प्रश्नांची उत्तरे अपेक्षित आहे. माझे प्रश्न पुढीलप्रमाणे आहेत:- किती कुटुंबे प्रभावित झाली? किती कुटुंबांना पूर्ण मोबदला मिळाला? किती कुटुंबांचे पुनर्वसन झाले? किती प्रकरणे प्रलंबित आहेत? किती जमीन अणि घरांचे प्रश्न बाकी आहेत? या प्रश्नांचे अधिकृत, कोगदोपत्री आणि कुटुंबनिहाय उत्तर आम्हाला हवे आहे. कंपनी ज्या नूसार १.५ दशलक्ष टन पासून ३.० दशलक्ष टनाची वाढील उत्पादनाची परवानगी मागत आहे, त्यानूसार कंपनीकडे पर्यायी जमीन उपलब्ध आहे काय. पुढील २३ महिन्यात पर्यावरणीय मंजूरी मिळाल्यानंतर खाणीचा माईनिंग प्लान येथे सांगण्यात यावा. | |
| २) | दुसरा मुद्दा- आधीच्या पर्यावरणी अटींचे पालन. मागील पर्यावरणीय मंजुरीतील सर्व अटींचे पूर्ण पालन झाले आहे का, याची स्वतंत्र तपासणी न करता नवीन उत्पादनवाढीस मंजूरी देणे योग्य ठरणार नाही. म्हणून आमची मागणी आहे की-मागील EC मधील प्रत्येक अटीची compliance report सार्वजनिक करावी. कंपनीच्या अहवाला बरोबर सरकारी यंत्रणेचा तपासणी अहवाल द्यावा. हवा, पाणी, धूळ, आवाज, ब्लास्टींग, वाहतूक आणि भूजल यांचे प्रत्यक्ष monitoring data ग्रामस्थांना उपलब्ध करून द्यावे. मागील जनसुनावणीतील ग्रामस्थांच्या हरकतींपैकी किती मुद्दे सोडविले याचा Action Taken Report सादर करावा. सन २०२२ मध्ये कंपनीला मिळालेल्या परवारणीय मंजूरीतील अटी व शर्तींची पूर्तता केला आहे काय? हा परिसर औद्योगिक क्षेत्र असल्यामुळे या कंपनीच्या क्षेत्रात ३-स्तरीय वृक्ष लागवड होणे गरजेची आहे कारण या क्षेत्रात शेतकरी, शाळकरी मुलं आहेत. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, पुर्वीच्या पर्यावरणीय मंजूरीतील अटी व शर्तींचे अनुपालन कंपनीतर्फे करण्यात आले असून त्याचा सहामाही अनुपालन अहवाल संबंधित विभागाकडे सादर करण्यात आला आहे व त्याची तपासणी सुरू आहे. वृक्ष लागवड ही सतत चालणारी प्रक्रिया असल्याने दरवर्षी त्यामध्ये वाढ करण्यात येईल. आतापर्यंत जागेच्या उपलब्धतेप्रमाणे १८७०५ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. नवी विस्तारीकरण प्रकल्पामधून ६९० दशलक्ष घनमिटर ओव्हरबर्डन निर्माण होणार आहे. त्यापैकी ५५४ दशलक्ष घनमिटर अधिभार अंतर्गत डंपिंगकरिता वापरण्यात येणार आहे. तसेच खाण लीज क्षेत्रामध्ये फकत ९४ दशलक्ष घनमिटर इतक्या अधिभाराची डंपिंग करण्यात येणार आहे. गारलँड ड्रेन बनविण्यात येतील व siltation traps |

| | | |
|---|---|---|
| | प्रत्यक्षात कंपनीकडे लगतच्या केपीसीएल या कंपनीपेक्षा फार चांगला आराखडा आहे. कंपनीतर्फे पाहिजे त्या प्रमाणात ओवहरबर्डन क्षेत्रामध्ये वृक्ष लागवड करण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर प्रकल्पग्रस्त गावांमध्ये कंपनीतर्फे वृक्ष लागवडीसाठी जो खर्च अपेक्षित होता तो देखील केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल जो राखला पाहिजे होतो तो राखल्याचे दिसून येत नाही. पहिल्या टप्प्यात कोणत्या वर्षापर्यंत back filling चे काम पूर्ण करण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. | देखील बनविण्यात येतील. अधिभार ढिगाऱ्यांवर सद्य:स्थितीत कोणत्याही प्रकारची वृक्ष लागवड करण्यात आलेली नाही कारण पुढील ३ वर्षांमध्ये उत्खनन प्रक्रिया झाल्यानंतर भू-भरण करण्यासाठी त्या अधिभार ढिगाऱ्याचा वापर करण्यात येणार आहे. पुढील ३० वर्षांत कंपनीतर्फे back filling करण्यात येणार आहे. |
| ३) | तिसरा मुद्दा-उत्पादन दुप्पट होणार आहे. १.५० MTPA वरून ३.० MTPA म्हणजे उत्पादन क्षमतेत मोठी वाढ आहे. त्यामुळे आमचा प्रश्न आहे- कोळसा वाहतूक किती वाढणार? दररोज किती वाहनांची ये-जा होणार? धूळ किती वाढणार? पाण्याचा वापर किती वाढणार? ओव्हरबर्डन किती निर्माण होणार? ब्लास्टींगची तीव्रता किती वाढणार? गावातील रस्त्यांवर त्याचा काय परिणाम होणार? या सर्व प्रश्नांची संख्यात्मक उत्तरे EIA मध्ये स्पष्टपणे आणि ग्रामस्थांना समजेल अशा स्वरूपात देणे आवश्यक आहे. पर्यावरण मंजूरीनूसार कंपनीकडे एकही इ-वाहन उपलब्ध नाही. तसेच mechanical sweeping machine उपलब्ध नाही. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, ९०९१ टन/दिन उत्पादन होणार असून व दररोज ४० डंपर्सद्वारे वाहतूक राज्य/राष्ट्रीय महामार्गावरून वाहतूक करण्यात येणार आहे. कंपनीकडे mechanical sweeping machine उपलब्ध आहे. ती कार्यान्वित देखील करण्यात आली आहे. तसेच पाणी फवारणी यंत्रणा देखील कार्यरत आहे. मध्यंतरी कोळसा खाण बंद असल्यामुळे आपणांस ते दिसले नाही. |
| ४) | चौथा मुद्दा- गावाच्या अगदी जवळ असलेली खाण. हा फक्त कागदावरी ९३६ हेक्टरचा प्रकल्प नाही. इथे माणसे राहतात. इथे घरे आहेत. शेती आहे. शाळा आहेत. विहीरी आहेत. गावातील नागरीकांचे जीवन आहे. त्यामुळे खाण विस्ताराचा विचार केवळ "कोळसा उत्पादन किती होईल?" या दृष्टीकोणातून न करता "ग्रामस्थांच्या जीवनावर त्या परिणाम किती होईल?" या दृष्टीकोणातून झाला पाहिजे. गावाचे पुनर्वसन direct negotiation द्वारे करण्यात येत आहे. २६/०६/२०२४ मध्ये जो सेक्शन ४ लावण्यात आला तो कोण लावला. सेक्शन ४ लावण्यामध्ये कंपनी उद्देश काय आहे. आपण ५० टक्के नागरीकांसोबत direct negotiation केले. त्यानंतर SI अहवाल सादर करण्यात आला, त्यावर स्थानिकांचे काही आक्षेप आले. आपणाकडे ८००-९०० लोकांची यादी आली. त्यामुळे कंपनीतर्फे किती कालावधीमध्ये पुनर्वसन करण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. ग्रामपंचायतीच्या आकडेवारीनूसार बेलोरा गावाची लोकसंख्या सुमारे २५०० इतकी आहे. त्या तुलनेमध्ये | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, बेलोरा गावाच्या पुनर्वसनाचा आराखडा तयार असून मोजणीनूसार ३५२ घरांची कागदपत्रे आमच्याकडे आलेली आहेत व पुढील प्रक्रिया सुरू आहे. उर्वरित १०५ घरांचे कर पावत्या न मिळाल्यामुळे प्रकरण प्रलंबित आहे. कर पावत्या प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल. लाभार्थ्यांना त्याच्या खात्यामध्ये धनाकर्ष बँकेकडून थेट जमा करण्यात येईल. आपणांस कागदपत्रांसह आपल्या प्रश्नाबाबत उत्तरे देण्यात येतील.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर यांनी सांगितले की, कंपनीने पुनर्वसनाची प्रक्रियेमध्ये गती आणावी व पुनर्वसनाची प्रक्रिया लवकरात लवकर करावी. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीकडून फक्त १५ टक्के घरांचे पुनर्वसन झाल्याचे दिसून येत आहे. कंपनीने व्यवस्थित नियोजन करून पुनवर्सनाची प्रक्रिया पर्यावरण मंजूरी मिळेपर्यंत करायला हवी. तसेच कंपनीने SI सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर गावकऱ्यांना कागदपत्र जमा करण्यासाठी नोटीस बजावयाला पाहिजे होती. कंपनीने दर आठवड्याला किमान १०० घरांचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे, तेव्हाच पुनवर्सनाच्या प्रक्रियेला गती मिळणार. भविष्यात उद्योगाच्या विस्तारीकरणामुळे कोळसा उत्खनन करताना ब्लास्ऑींग करण्यात येईल व त्यामुळे गावातील घरांना तडे जाऊन मुनष्य व घरांची हानी होण्याची शक्यता आहे. जर कंपनीतर्फे पुनर्वसनाची प्रक्रिया लवकरात लवकर करण्यात येत नसल्यास राज्य शासनाने व केंद्र शासनाने या विस्तारीकरण प्रकल्पाला परवानगी देताना एकदा विचार करावा असे माझे मत आहे. जर विस्तारीकरणाची परवानगी मिळाली तर त्या विरोधात केपीसीएल प्रमाणे पर्यावरणीय मंजूरी विरोधात पुढील कार्यवाही करावी लागेल. आम्हाला कंपनीच्या प्रकल्पाला विरोध नाही. केपीसीएल या कंपनीने त्यांच्या जवळपासच्या गावांकरिता कोणतेही काम केलेल नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पुनर्वसनाबाबत संवेदनशीलपणे व लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल. |
| ५) | पाचवा मुद्दा-भूजल आणि शेती. कोळसा खाणकामामुळे भूजल पातळीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे गावातील विहीरी, बोअरवेल आणि शेतीसाठी उपलब्ध पाण्याचा आजचा Baseline Data आणि पुढील परिणामाचा वैज्ञानिक अभ्यास सार्वजनिक करावा. उद्या गावातील विहीरी कोरड्या पडल्या, शेतीचे नूकसान झाले किंवा पाण्याची गुणवत्ता खराबा झाली, तर त्याची जबाबदारी कोणाची? याचे उत्तर आजच स्पष्ट झाले पाहिजे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ६) | सहावा मुद्दा-धुळ व आरोग्य. कोळसा उत्खनन, Crushing, loading आणि Transportation यामुळे धुळीचे प्रदुषण वाढण्याची शक्यता आहे. म्हणून गावाच्या परिसरात सतत हवा गुणवत्ता मोजण्यासाठी monitoring stations बसवावेत आणि त्यांचा data ग्रामपंचायत व ग्रामस्थांना ऑनलाईन/सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध करून द्यावा. किलोनी गावाच्या एका कामगाराने कौटुंबिक कारणांमुळे नोकरी सोडली होती. त्या कामगाराला कंपनीने ६ महिन्यात नोकरीवर रूजू करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु एक वर्ष होऊन देखील कंपनीने कामावर रूजू केले नाही. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, सदर इसमास तात्काळ कामावर रूजू करण्यात यावे. |

२२) **श्री. महेश कवडुजी मोरे, ग्रामपंचायत कोंढा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने परिसरातील गावांकरिता बरेच चांगले काम केले आहे. परंतु बेलोरा गावाचे पुनर्वसन कोणत्या ठिकाणी करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात यावी. कावडी गावाचे ३० वर्षांपूर्वी पुनर्वसन करण्यात आले. आज अर्धे गाव कुचना येथे आहे व अर्धे गाव भद्रावती येथे आहे. गावकऱ्यांनी हा प्रश्न उपस्थित करायला पाहिजे होता असे माझे मत आहे. कंपनीने एक जागा नेमायला पाहिजे होती ज्या ठिकाणी बेलोरा गावाचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. तसेच कंपनीने पुनर्वसनाच्या ठिकाणी सर्व सुविधा उपलब्ध करून द्यावा. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

२३) **श्री. सचिन डुकरे, उप-सरपंच, ग्रामपंचायत कढोली, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | अरविंदो या कंपनीने पत्राद्वारे आमच्या गावातील स्थानिकांना रोजगार देण्याबाबत सांगितले होते. परंतु आमच्या गावातील एकाच व्यक्तिला नोकरी देण्यात आली. आमच्या गावातील २५-३० युवकांची यादी कंपनीकडे दिलेली असून आजपर्यंत एकाही युवकाला नोकरी देण्यात आली नाही. कंपनीशी संवाद साधला असता आमच्या ग्रामपंचायतीशी कंपनीला काहीही घेणे-देणे नाही असे उत्तर कंपनीतर्फे देण्यात येते. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, रोजगाराचा मुद्दा वारंवार उपस्थित केला जात असून कंपनीने स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात माहिती देण्यात येईल.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीच्या धोरणामध्ये स्थानिकांना नोकरी देण्याची तरतूद असून स्थानिकांना त्यानूसार रोजगार देण्यात येईल. स्थानिकांच्या नोकऱ्यांबाबत संवेदनशीलपणे सकारात्मक विचार करण्यात यावा. |

२४) **श्री. प्रफुल चटकी, नगराध्यक्ष, नगर परिषद भद्रावती, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज येथे पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्यात येत आहे. भारत सरकारने १९/११/१९८६ रोजी एक कायदा तयार केला आहे. त्यावेळी भोपळ शहरात वायु गळती झाली होती. आज येथे एम्टा ही खाण तयार झाली, दुसरी अरविंदो खाण होत आहे. परंतु आपल्याला माहिती आहे की, चंद्रपूर जिल्हा हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा प्रदूषित जिल्हा आहे. प्रदूषणामुळे या जिल्ह्यातील लहान मुलांना आजारांची लागण होत आहे. पर्यावरणातील पाण्याचे प्रदूषण आपल्या खाणीच्या माध्यमातून होत असते. एम्टा खाण ते अरविंदो खाण या क्षेत्रातील पाणी प्रदूषित होत असल्याबाबत प्रदूषण नियंत्रण मंउळाकडे तक्रार सादर केली होती. खाणीतील पाणी विना प्रक्रिया न सोडता तेथे घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (STP) बसवायला पाहिजे. परंतु कालांतराने त्या सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेची देखभाल व दुरूस्ती केली जात नाही व प्रदूषित पाणी नाल्यामध्ये सोडले जाते. आज महाराष्ट्र शासनातर्फे पाण्याचे प्रदूषण रोखण्याबाबत सांगण्यात येते. पाण्यामुळे सर्वात जास्त प्रमाणात आजार होतात. चंद्रपूर जिल्ह्यात कर्करोगाचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात आहे. महिलांना गर्भाशयाचा कर्करोग व लहान मुलांना देखील कर्करोगाची लागण होत आहे. परंतु या गोष्टीकडे कुठलीही कंपनी लक्ष देत नाही. कंपनीने भद्रावती शहरातील व खाणीच्या लगतच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्याबाबत उपाययोजना करणे गरजेचे आहे. कंपनी या तालुक्यासाठी त्यांच्यामार्फत एक हॉस्पीटल देणार काय. या क्षेत्रात बरेच गाव प्रकल्पग्रस्त होणार आहेत. या प्रकल्पाची झळ भद्रावती शहरातील नागरीकांपर्यंत पोहोचणार आहे. चंद्रपूर जिलह्यामध्ये तापमानाचे प्रमाण ४५ अंश सेलिशअस पेक्षा जास्त असून ते फक्त या जिल्ह्यातील कोळसा खाणींमुळे आहे. तसेच हवेची गुणवत्ता देखील अत्यंत प्रदूषित आहे. मी गावकऱ्यांमार्फत कंपनीला विनंती करतो की, त्यांनी हवा व जल प्रदूषणाबाबत योग्य त्या उपाययोजना कराव्या. भद्रावती शहर हे ५० ते ६० हजार लोकवसतीचे गाव आहे. बरेच उद्योग म्हणतात की भद्रावती शहर हे त्यांच्या अखत्यारीत येत नाही. परंतु महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानूसार उद्योगाच्या ११.० | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | कि.मी. परिघात येणाऱ्या गावांमध्ये सीएसआर निधी अंतर्गत काम केले पाहिजे. परंतु एम्टा व अरविंदो या खाणींनी आजपर्यंत भद्रावती शहरामध्ये एकही काम सीएसआर निधी अंतर्गत केले नाही. प्रकल्प उभा करताना शासनाच्या कुठल्याही मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्यात येत नाही. म्हणून मी आजच्या जनसुनावणीच्या अध्यक्षांना विनंती आहे की माझ्या मुद्यांची नोंद जनसुनावणीच्या इतिवृत्तामध्ये घेऊन कंपनीने योग्य त्या उपाययोजना केल्या पाहिजे. | |

२५) **श्री. मुकेश जिवतोडे, लोकसभा संघटक, चंद्रपूर-वणी-आर्णी क्षेत्र, शिवसेना, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर जनसुनावणीमध्ये फक्त पर्यावरणाशी संबंधित मुद्यांशी निगडी राहते की कामगार, पुनर्वसन, कंपनीचे धोरण या विषयांशी निगडीत राहते याबाबत माहिती देण्यात यावी. या ठिकाणी सर्व शेतकरी, प्रकल्पग्रस्त त्यांचे कामांवरून सुट्टी घेऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण होईल या उद्देशाने हजेरी लावतात. आमच्यातर्फे एम्टाच्या जनसुनावणीदरम्यान उपस्थित नागरीकांनी त्या प्रकल्पाला विरोध करून देखील पर्यावरण मंजूरी देण्यात आली. त्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे कंपनीने घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारली नसल्याबाबत वारंवार तक्रारी देखील दिल्या. तसेच कंपनीला नाले वळवायचे होते ते वळविण्यात आले नाही. खाणीतील विनाप्रक्रिया सांडपाणी नाल्याद्वारे थेट नदीमध्ये सोडले जात असल्याने भूगर्भातील पाणी प्रदूषित होऊन नळाद्वारे स्थानिकांना पिण्यासाठी देण्यात येत असल्याबाबत देखील तक्रार दिली होती. जनसुनावणीतील मुद्यांची दखल न घेता व पर्यावरणाच्या नियमांचे पालन न करणाऱ्या उद्योगांना परस्पर मंजूरी कशी देण्यात येते? एम्टा खाणीच्या प्रदूषणाबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी असताना तसेच त्यांच्यातर्फे पर्यावरणीय नियमांचे कोणत्याही प्रकारचे अनुपालन केले नसल्याचे निदर्शनास येऊन देखील परवानगी देण्यात आली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे स्थानिकांची दिशाभूल करण्यात येत आहे. स्थानिक गरीब नागरीक मोठ्या आशेने आपणाकडे | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, जनसुनावणीदरम्यान पर्यावरणासोबत जमीन अधिग्रहण, पुनर्वसन, नोकरी, मोबदला या सर्व गोष्टींचा समावेश केला जातो. जनसुनावणीदरम्यान उपस्थित मुद्यांची नोंद घेऊन त्यावर कंपनीकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती घेण्यात येते. त्यानूसार जनसुनावणीचे ईतिवृत्तांत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात येते. उद्योगांना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मंजूरी देण्यात येते.<br><br>मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, पर्यावरणीय मंजूरी ही केंद्र शासनाकडून देण्यात येते. त्याबाबत जनसुनावणीदरम्यान कोणतेही निर्णय घेण्यात येत नाही. जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यांची जशासतशी नोंद घेऊन केंद्र शासनाकडे सादर करण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| | तक्रारी घेऊन येतात. त्या कंपनीला जिल्हाधिकारी कार्यालय व पर्यावरण विभाग यांच्याकडून परवानगी मिळाली. स्थानिक अधिकाऱ्यांनी सकारात्मक अहवाल पाठविल्याशिवाय उद्योगांना परवानगी मिळू शकत नाही. एम्टा खाणीच्या जनसुनावणीदरम्यान २ ते ३ हजार नागरीकांनी बहिष्कार टाकला होता, तरी त्या उद्योगास पर्यावरणीय मंजूरी देण्यात आली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी व उप-प्रादेशिक अधिकारी यांनी एम्टा कंपनीच्या तक्रारींची पूर्तता केली नाही. एम्टा कंपनीने कोणत्याही प्रकारचे अनुपालन केले नाही. तुमच्या या निष्काळजीपणामुळे प्रकल्पबाधित नागरीकांना कोळशाच्या धुळीचा त्रास होतो. आपण सर्वसामान लोकांसाठी काम केले पाहिजे. | |
| २) | या कंपनीमध्ये पुनर्वसनाची प्रक्रिया व्यवस्थित झाली पाहिजे. तसेच स्थानिक लोकांना देखील रोजगार मिळाला पाहिजे. व्हॉल्व्हो ऑपरेटरसाठी कंपनीने प्रशिक्षण केंद्र सुरू करून स्थानिकांना व्हॉल्व्हो ऑपरेटरचे प्रशिक्षण देऊन कंपनीमध्ये कार्यरत करण्यात यावे. वरोरा येथे १३५X४ मेगावॅट क्षमतेचे वर्धा पॉवर व ३००X२ मेगावॅट क्षमतेचे जीएमआर हे दोन विद्युत प्रकल्प सुरू आहेत. त्या वेळी स्थानिक नागरीक कामगार म्हणून कार्यरत होते. परंतु आज १० वर्षांनंतर तेच कामगार कन्व्हेअर ऑपरेटर, डोझर ऑपरेटर, स्टॅकर ऑपरेटर या पदावर कार्यरत आहेत. स्टोन पिचींगचे काम खांडला कंपनीकडून करण्यात येत होते. ते काम देखील येथील स्थानिक नागरीकांनी शिकून घेतले. कंपनीने स्थानिकांवर विश्वास ठेवला व शिकण्याची संधी दिली. कंपनीच्या अधिकाऱ्यातर्फे गाडी महाग असल्याचे कारण सांगून टाळण्यात येते. बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. आपण या समाजाचे घटक असल्याने समाजाचे भले करण्याचे दायित्व असले पाहिजे. प्रत्येक प्रकल्प धारकाला हीच भिती असते की स्थानिक नागरीकांना नोकरी दिल्यास संघटना तयार करून काम करणार नाही. वर्धा पॉवर कंपनीमध्ये ९५ टक्के स्थानिक नागरीक आहेत. तसेच जीएमआर कंपनीमध्ये देखील ९५ टक्क्यांपेक्षा जास्त प्रमाणात स्थानिक नागरीकांना रोजगार देण्यात आला आहे. जर कंपनीने स्थानिकांशी व्यवस्थित संवाद साधला, त्यांना केंद्रीय व राज्य शासनाच्या नियमानूसार किमान वेतन लागू केले, कामगारांना वेळेवर | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिलहादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात यावी व त्यावर तात्काळ कार्यवाही करावी. |

| | | |
|---|---|---|
| | वेतन, सुट्ट्या दिल्या तर स्थानिक कामगार देखील कंपनीकरिता चांगले काम करतील. परंतु कंपनीच्या मनातून जोपर्यंत गैरसमज दूर होत नाही तोपर्यंत काहीही होऊ शकणार नाही. कंपनीतर्फे बाहेरचे ट्रान्स्पोर्टर्सची वाहतूकीकरिता नेमणूक करण्यात येते. कंपनीने कुटुंबातील एका सदस्याला नोकरी दिल्यानंतर दुसऱ्या सदस्याला प्रोत्साहन दिले तर सर्वांचे भले होईल. तसेच बेरोजगारीचे प्रमाण कमी होईल. कंपनीमुळे कोणत्याही लोकप्रतिनिधीला फायदा न होता स्थानिक नागरीकांपर्यंत पोहोचला पाहिजे. उपस्थित अधिकाऱ्यांनी शिक्षण, आरोग्य विषयक समस्यांकडे लक्ष दिले पाहिजे आणि बेरोजगारांना न्याय मिळवून दिला पाहिजे. | |

**२६) श्री. विठ्ठल पुनवटकर, प्रकल्पग्रस्त तथा माजी उप-सरपंच, ग्रामपंचायत बरांज मोकासा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | उपविभगीय अधिकारी यांच्यामार्फत नेमणूक केली गेली होती. पुनर्वसनसाठी त्यानूसार एसआरआय यादी प्रसिद्ध करण्यात आली. त्यावर कंपनीतर्फे कार्यवाही कधी करण्यात येणार आहे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| २) | एसआरए यादीनूसार पुनर्वसन यादी का नाही. एसआरए सर्वेक्षणानूसार मोबदला रक्कम का दिला जात नाही. एसआरए सर्वेक्षण झाले असल्यास त्या यादीनूसार त्यांची घरे कंपनीने घ्यायला पाहिजे. कंपनीतर्फे विलंब का करण्यात येत आहे. कंपनी शासनाकडे ३.० दशलक्ष टन इतक्या उत्पादनासाठी परवानगी मागत आहे. कंपनीकडे जागा उपलब्ध नाही. गावापासून २००-३०० मीटर अंतरावर कंपनीचे काम आले आहे. त्यामुळे गावांना अधिकचा धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे एसआरए सर्वेक्षणामध्ये ज्यांची नावे आली आहेत त्यंची घरे कंपनीने तात्काळ घ्यावे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |
| ३) | माझी शेती सर्वे क्रं. ४६/२ व ४६/३ या कंपनीच्या डंपिंगला लागून आहे. डंपिंगला लागून असल्यामुळे वायु प्रदूषण होत आहे व माझ्या विहीरीचे पाणी पातळी खालावलेली आहे. त्यामुळे माझ्या पिकांचे नूकसान होत आहे. त्यामुळे कंपनीने मला दरवर्षाला नूकसान भरपाई म्हणून एकरी १.० लक्ष रूपये द्यावे. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ४) | कंपनीने २४१००० वृक्ष लागवड प्रस्तावित असल्याचे सांगितले आहे. परंतु कंपनीने तापमान कमी करण्यासाठी व प्राणवायुचे प्रमाण वाढविण्यासाठी कोणत्या प्रकारची झाडे लावण्याचे प्रस्तावित आहेत त्याची यादी देण्यात यावी. सोमनाळा, बरांज मोकासा, किलोनी येथे आमच्या लोकांची शेती आहे. त्या लोकांना या कंपनीतर्फे रोजगार कधी देण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. बरांज गावातील स्थानिकांना एकही रोजगार देण्यात आला नाही. भारत सरकारच्या २०१३ च्या कायद्यानूसार जोपर्यंत गावाचे पूर्ण पूनर्वसन होत नाही तोपर्यंत घरांना तात्पूरते कुलूप लावण्यात यावे. अन्यथा आम्हाला कंपनीच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागेल. त्याची संपूर्ण जबाबदारी कंपनीवर राहणार. | मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांनी सांगितले की, वृक्ष लागवड, एसआरए सर्वेक्षणाची यादी व स्थानिकांना रोजगार देण्यात यावा. |

### २७) श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी, व्ही. सुनंदा रेड्डी, वय ७० वर्षे, भारतातील औद्योगिक विकासाला समर्थन देणाऱ्या ज्येष्ठ पर्यावरणवाद्यांपैकी एक आहे. आजपर्यंत मला कोणत्याही आरोग्यविषयक समस्या उद्भवलेल्या नाहीत. मी एक व्यावहारिक पर्यावरणवादी आहे. व्यवस्थापनास माझ्या हार्दिक शुभेच्छा व पूर्ण समर्थन आहे. शाश्वत औद्योगिक विकासाला समर्थन देणारा मी भारतातील पहिला पर्यावरणवादी आहे. सामान्यतः पर्यावरणवादी व स्वयंसेवी संस्था (NGOs) औद्योगिक विकासाच्या उपक्रमांना विरोध करतात. परंतु, मी औद्योगिक उपक्रमांना मनापासून समर्थन देत आहे. माझ्या मते, बेरोजगारी ही भारतातील सर्वात मोठी प्रदूषणाची समस्या आहे. भारतात दरवर्षी अंदाजे १.० कोटी युवक बेरोजगारांच्या वर्गात प्रवेश करतात. केंद्र सरकार व सर्व राज्य सरकारे मिळून केवळ ५ ते ६ लाख युवकांना रोजगार उपलब्ध करून देऊ शकतात आणि उर्वरित सुमारे ९५ लाख युवक औद्योगिक क्षेत्रावर अवलंबून असतात. सध्या १८ ते ३५ वर्षे वयोगटातील सुमारे ४० कोटी युवक चांगल्या रोजगाराच्या संधींची प्रतीक्षा करीत आहेत. त्यामुळे राज्यात औद्योगिक विकासाची तातडीची गरज आहे. पर्यावरणवादी व स्वयंसेवी संस्था उद्योगांमुळे | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | सार्वजनिक आरोग्याचा ऱ्हास होत असल्याचा आरोप करतात. मात्र, भारतातील केवळ १५% लोकसंख्या औद्योगिक उपक्रमांच्या परिसरात राहते. त्यामुळे आरोग्यविषयक समस्यांसाठी केवळ उद्योगांना दोष देणे योग्य नाही. उर्वरित ८५% लोकसंख्येलाही औद्योगिक प्रदूषणाचा थेट परिणाम नसतानादेखील विविध आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पर्यावरणीय समतोलाचे संरक्षण करतानाच औद्योगिक विकासाची गरज पूर्ण करण्याची हीच योग्य वेळ आहे. आपल्या औद्योगिक उपक्रमांचा विकास आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी मी काही सूचना देत आहे.<br><br>१) आपल्या पर्यावरणीय सल्लागाराने हवा, पाणी व जमिनीचा बेसलाइन सर्वेक्षण/अभ्यास आधीच केलेला आहे, ही बाब अतिशय चांगली व समाधानकारक आहे. माझी विनंती आहे की, प्रकल्पाच्या १० कि.मी. त्रिज्येतील लोकांच्या आरोग्यस्थितीची माहिती, पिकांच्या उत्पादनाची स्थिती तसेच भूजल उपलब्धतेची स्थिती याबाबतची माहिती संकलित करावी. ही माहिती भविष्यात अत्यंत उपयुक्त ठरेल तसेच पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक व प्रभावी उपाययोजना करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण मापदंड म्हणून तिचा उपयोग करता येईल.<br>२) माझी नम्र विनंती आहे की, पावसाचे पाणी साठविण्यासाठी जलसंधारणाच्या रचना व पाणीसाठवण व्यवस्था निर्माण करावी. यामुळे उद्योगासाठी पाण्याचा उपयोग करता येईल तसेच या परिसरातील भूजलपातळी वाढण्यास मदत होईल. आपल्या उद्योगासाठी वापरले जाणारे पाणी शक्य तितके पावसाळ्यात संकलित व साठवून ठेवावे, जेणेकरून पावसाळ्यानंतरच्या दिवसांत त्याचा उद्योगासाठी उपयोग करता येईल.<br>३) जवळच्या गावांमध्ये ग्रामवृक्षारोपण तसेच आपल्या वाहनांद्वारे खनिज/साहित्याची वाहतूक केली जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यांच्या दुतर्फा अवेन्यू वृक्षारोपण हाती घ्यावे, जेणेकरून धुळीचे प्रदूषण नियंत्रित करता येईल. माझी विनंती आहे की, नेहमीच्या वृक्षांऐवजी | |

| | | |
|---|---|---|
| | फळझाडे व औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पतींना प्राधान्य द्यावे. यामुळे धुळीचे प्रदूषण नियंत्रित होण्यास मदत होईल तसेच जवळच्या गावांतील नागरिकांना फळांचा लाभ मिळेल.<br>४) आपल्या उद्योगामध्ये रोजगार देताना स्थानिक सुशिक्षित बेरोजगार युवकांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे.<br>५) बेरोजगार युवकांना उद्योगासाठी तसेच इतर ठिकाणी रोजगार मिळविण्यासाठी आवश्यक कौशल्ये प्राप्त व्हावीत, यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाला प्रोत्साहन द्यावे. भारतात कौशल्य विकासाच्या बाबतीत अजून मोठ्या प्रमाणावर काम करण्याची आवश्यकता आहे. जपान व कोरियासारख्या देशांमध्ये सुमारे ९५% युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण मिळालेले आहे, तर भारतात हे प्रमाण केवळ ५ ते ६% इतके आहे.<br>६) कंपनीचे अधिकारी, शासकीय अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे (PCB) अधिकारी आणि गावकऱ्यांचा समावेश असलेली समन्वय समिती स्थापन करावी. या समितीच्या माध्यमातून CSR निधीतून करण्यात येणाऱ्या कामांसाठी कृती आराखडा तयार करावा. गावाच्या विकासासाठी अत्यावश्यक आणि नागरिकांच्या मागणीनुसार असलेली कामे करण्यासाठी ही व्यवस्था अत्यंत उपयुक्त व अर्थपूर्ण ठरेल. केवळ उद्दिष्टपूर्तीसाठी केली जाणारी कामे टाळावीत. या उपक्रमामुळे आपल्या कंपनीची विश्वासार्हता व प्रतिष्ठा मोठ्या प्रमाणात वाढेल.<br>७) नियमितपणे आरोग्य शिबिरे आयोजित करावीत तसेच आरोग्य व रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्याबाबत जनजागृती कार्यक्रम राबवावेत.<br>८) समाजातील दुर्बल घटकांसाठी ग्रामीण प्राथमिक शिक्षणाला सहकार्य करावे.<br><br>पुन्हा एकदा, आपल्या औद्योगिक विकासासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा व पूर्ण समर्थन आहे. त्याचबरोबर, पर्यावरणीय समतोल आणि पर्यावरणीय सुरक्षितता यांची योग्य प्रकारे जपणूक करावी, ही विनंती आहे. आपल्या प्रकल्पासाठी सविस्तर पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवाल तयार करणाऱ्या पर्यावरणीय सल्लागार | |

| | | |
|---|---|---|
| | संस्थेचेही मी अभिनंदन करतो. सदर अहवाल अतिशय चांगला व समाधानकारक आहे. शेवटी, मी सार्वजनिक सुनावणी पॅनेल/समितीस विनंती करतो की, महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील तकळी-जिना-बेलोरा व इतर गावांमध्ये असलेल्या तकळी-जिना-बेलोरा उत्तर व दक्षिण कोळसा खाण क्षेत्रात, विद्यमान खाण क्षेत्राच्या मर्यादेत खाणकामाचा विस्तार प्रस्तावित करणाऱ्या मे. ऑरो इन्फ्रा प्रा. लि. या कंपनीच्या प्रकल्पास पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाकडून (MoEFCC) बिनशर्त परवानगी देण्याची शिफारस करावी. | |

**२८) कु. पुनम नंदकिशोर कायरकर, प्रकल्पग्रस्त, बेलोरा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने स्थानिक विद्यार्थ्यांसाठी बसची सुविधा पूरविलेली आहे. कर्मवीर विद्यालय जेना येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना बसमध्ये प्रवास का करू दिला जात नाही. कंपनीचे घरांचे पुनर्वसन करण्याचे काम प्रशंसा करण्यायोग्य आहे. त्याचप्रमाणे कंपनीतर्फे अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा यांची जमीन अधिग्रहीत करण्यात येणार असल्याने त्याचा मोबदला कसा देण्यात येईल. कंपनीने स्थानिकांचे वेतन वाढवावे. तसेच त्यांचे प्रश्न सोडविण्याकडे लक्ष देण्यात यावे. स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार काम देण्यात यावे. शासकीय इमारतीच्या पुनर्वसनाबाबत कंपनीने काय धोरण आहे याची माहिती देण्यात यावी. पुनर्वसनाकरिता लोक तयार असताना कंपनीने पुनर्वसन करण्यास नकार का दिला याची माहिती देण्यात यावी. कंपनीने त्या लोकांना सर्व सोई सुविधा उपलब्ध करून त्यांचे पुनर्वसन केले असते तर त्या लोकांचा फायदा झाला असता. | मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. |

**२९) प्रकल्प प्रवर्तकांतर्फे देण्यात आलेली उत्तरे:-**

| अ. क्रं. | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १) | माझे नांव अफरोज असून मी मे. ऑरो इन्फ्रा या कंपनीचा मुख्य कार्यकारी अधिकारी आहे. सद्य:स्थिती आमची खाण १.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेने कार्य करत असून ३.० दशलक्ष टन प्रतिवर्ष पर्यंत वाढीव उत्पादन घेण्याचे प्रस्तावित आहे. मागील ३ वर्षांपासून आपण सर्व आमचे भागीदार व साक्षीदार राहिलेले आहेत. आमच्या प्रकल्पाला जेव्हा पण अडचणी आल्या तेव्हा आपण सर्वांनी सहकार्य भूमिका घेत प्रकल्पाला मदत केली. विशेषत: गावासाठी परिचय करण्यासाठी आपणाकडून पूर्ण सहकार्य प्राप्त झाले. आगामी किमान दोन पिढींपर्यंत आम्ही आपले सहकार्य व एक चांगले शेजारी होण्याचा प्रयत्न करत आहे. मी ही या परिस्थितीतून गेलो असल्याने मला स्थानिक समस्यांची माहिती आहे. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, आज आपल्या समोर उपस्थित राहणे ही अत्यंत सन्मानाची आणि अभिमानाची बाब आहे. आम्ही उपस्थितांचे सर्व प्रश्न व समस्या ऐकल्या आहेत व त्यांचे जास्ती जास्त प्रमाणात निराकरण करण्याचे आमचे प्रयत्न आहेत. मला आज समजले की या ठिकाणी रोजगाराची व पुनर्वसनाचा समस्या मोठी आहे. आमच्यातर्फे स्थानिकांशी संवाद साधून कशा प्रकारे स्थानिकांच्या समस्या कशा प्रकारे सोडविता येईल व त्याचे टार्गेट लवकरात लवकर कसे साध्य करता येईल याकडे लक्ष दिले जाईल. जमीन अधिग्रहण, पुनर्वसनाची प्रक्रिया कशा प्रकारे सोपी करता येईल याबाबत स्थानिकांसोबत चर्चा केली जाईल. आपण उपस्थित सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.<br>कंपनीने ९३६ हेक्टर जागा अधिग्रहीत न करता विस्तारीकरणाची प्रक्रिया कशी सुरू केली याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. कंपनीतर्फे बँकेशी टायअप करून पुनर्वसनाचा धनाकर्ष थेट लाभधारकाच्या खात्यामध्ये जमा करण्यात येत असून ते फास्टट्रॅक करण्यात आले आहे. दुसरा प्रश्ना असा होता की पुनर्वसनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली नाही. फक्त १२७ घरांबाबत कार्यवाही का करण्यात आली. कंपनीतर्फे १२७ घरे घेण्यात आली असून आणखी ५० घरांचे धनाकर्ष आमच्याकडे तयार आहेत. सदर प्रक्रिया पुढील एक महिन्यामध्ये उर्वरित घरांची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. तिसरा प्रश्न असा होता की, सीएसआर अंतर्गत किलोनी गावामध्ये फार कमी काम करण्यात आले आहेत. त्याबाबत किलोनी गावामध्ये पूर्वीच एक आरओ प्लांट बसविण्यात आले आहे. पुढील २-३ महिन्यांच्या कालावधीमध्ये किलोनी गावामध्ये आणखी कामे सीएसआर अंतर्गत करण्यात येतील. पुढील प्रश्न असा होता की, कंपनीतर्फे विनाप्रक्रिया पाणी नदी व नाल्यामध्ये सोडले जाते. त्याबाबत कंपनीतर्फे सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविण्याचे काम सुरू आहे. प्रक्रियाकृत सांडपाणी सिंचनाकरिता देण्यात येईल. पाझराच्या पाण्यावर योग्य पद्धतीने प्रक्रिया करून त्याची योग्य विल्हेवाट लावावी. याबाबत कंपनीतर्फे सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसविण्याचे काम सुरू आहे. प्रक्रियाकृत सांडपाणी सिंचनाकरिता देण्यात येईल. पर्यावरणीय संरक्षणाकरिता कोण-कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत. याबाबत लेखी स्वरूपात माहिती देण्यात येईल. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये प्रदूषण नियंत्रणाबाबत प्रस्तावित उपाययोजनांबाबत माहिती देण्यात आली असून त्याची प्रत स्थानिकांना देण्यात येईल. या परिसरात हॉस्पीटल उभारण्याकरिता परिसरातील सर्व उद्योगांसोबत समन्वय साधून त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. प्राथमिक शाळेबाबत आमच्या पुनर्वसनाच्या समितीसोबत याबाबत चर्चा करण्यात येईल. येथे रोजगाराबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला होता की, स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. मी स्वत: याबाबत लक्ष केंद्रीत करत आहे की स्थानिकांना रोजगारात कशा प्रकारे सामावून घेण्यात येईल. स्थानिकांना त्याच्या शैक्षणिक अर्हतेनूसार नोकरी देण्यात येईल. तसेच अकुशल युवकांना प्रशिक्षण देखील देण्यात येईल. त्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. समान काम समान वेतनाबाबत विचार करण्यात येईल व त्याबाबत योग्य ते धोरण कंपनीतर्फे अंमलात आणण्यात येईल. त्याकरिता आम्हाला थोडा वेळ देण्यात यावा. एचपीसीबाबत आमच्यातर्फे कामगार विभागकडे पूर्वीच दोन अर्ज सादर केले असून त्याबाबत कामगार विभागाकडून जे काही उपाययोजना किंवा मार्गदर्शन मिळणार त्यानूसार त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| | २०२२ मध्ये झालेला जनसुनावणीमध्ये उपस्थित केलेलया मुद्यांचे अनुपालन झाले किंवा कसे याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्याबाबत आपणास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची प्रत देण्यात येईल त्यामध्ये संपूर्ण माहिती आपणांस मिळणार. कामगारांकरिता वैद्यकीय सुविधा पूरविण्यात येत आहेत. तसेच कंत्राटी कामगारांना वैद्याकीय सुविधा कशा प्रकारे पूरविले जाऊ शकते याबाबत कंपनीतर्फे धोरण तयार करण्यात येत आहे. स्थानिकांना कंत्राट देण्याची विनंती करण्यात आली होती. याबाबत कंपनीतर्फे स्थानिकांना कंत्राट देण्याचा प्रयत्न असतो. तसेच कंपनीतर्फे स्थानिकांसोबत चर्चा करून त्यांना त्याबाबतचे प्रशिक्षण देण्याबाबत विचार करण्यात येत आहे. उपस्थितांच्या प्रश्नांची कंपनीतर्फे लेखी स्वरूपात उत्तरे देण्यात येतील. एसआयए सर्वेक्षणाबाबत शासनातर्फे अंमलबजावणी करण्यात येते. अंगणवाडी सेविका व इतर बेरोजगार होणाऱ्या लोकांना त्याच्या शैक्षणिक अर्हतेनूसार कंपनीमध्ये नोकरी देण्यात येईल. श्री. द्विवेदी यांच्याबाबत बुधवारला दुपारी ०४:०० वाजता बैठक घेण्यात येईल. एसआयएबाबत स्थानिकांना कार्यालयामध्ये माहिती देण्यात येईल. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याची विनंती केली. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे व त्याचप्रमाणे स्र्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ५१ सूचना, आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(सुशिलकुमार राठोड)**<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(तानाजी यादव)**<br>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | **(डॉ. नितीन व्यवहारे)**<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर. |